शुक्रवार, १४ जुलै २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२९८
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●FRIDAY 14 JULY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-298 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5

# शिक्षकांची पदे भरण्यासाठी पंचायत समितीमध्ये भरली शाळा



आधुनिक केसरी न्यूज

**मंगरूळपीर :** तालुक्यातील पिंपळखुटा येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षकांची अनेक पदे रिक्त आहेत. ही पदे भरण्याची मागणी वारंवार करण्यात आली होती. मात्र, त्याकडे दुर्लक्ष केल्याने अखेर गुरुवारी पंचायत समितीमध्येच विद्यार्थी दाखल झाले. जोपर्यंत शिक्षक मिळत नाही, तोपर्यंत येथेच शाळा सुरू करावी, अशी मागणी करत पंचायत समितीमध्येच शाळा भरवली.

वाशीम जिल्ह्यातील बहुतांश शाळांत शिक्षकांची पदे रिक्त आहेत. पालक आपल्या मुलांना जिल्हा परिषद शाळेत दाखल करीत आहेत. मात्र, सरकारच्या उदासीन धोरणामुळे गोरगरीब विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आले आहे.

मंगरूळपीर तालुक्यातील पिंपळखुटा येथे सातवीपर्यंत शाळा आहे. विद्यार्थी संख्याही बऱ्यापैकी आहे. परंतु या शाळेत फक्त तीन शिक्षक आहेत. त्यापैकी एक शिक्षक सुट्टीवर असतो. प्रत्यक्षात केवळ दोन शिक्षक उपलब्ध असतात. त्यामुळे येथे शिक्षक देण्याची मागणी पंचायत समितीकडे करण्यात आली होती. परंतु, त्याकडे दुर्लक्ष केल्याने अखेर १३ जुलै रोजी शाळा व्यवस्थापन समितीने चक्क पंचायत समितीमध्येच विद्यार्थी दाखल करून जोपर्यंत शिक्षक मिळत नाही. तोपर्यंत येथेच शाळा सुरू करावी, अशी भूमिका घेतल्याने प्रशासनाची चांगलीच धांदल उडाली आहे.


जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेची स्थिती खालावत चालली असून अनेक शाळेत शिक्षकांची पदे रिक्त आहेत. पायाभूत सुविधांचा अभाव आहे. मात्र, याकडे सरकारचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप पालकांमधून होत आहे.

# महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू करा

## नाना पटोले : राज्यात अलिबाबा ४० चोरांसारखी परिस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : राज्यातील राजकीय वातावरण गढूळ झाले असून भाजपाच्या सत्तापिपासू वृत्तीने राज्यात शासन व प्रशासनही ठप्प आहे. जनतेला वाऱ्यावर सोडून देऊन मलाईदार खात्यासाठी साठमारी सुरु आहे. राज्यात अलिबाबा ४० चोरांसारखी परिस्थिती असून जनतेची तिजोरी लुटली जात आहे. राज्यपाल व महामहिम राष्ट्रपती यांनी यात हस्तक्षेप करुन राज्यात तातडीने राष्ट्रपती राजवट लागू करावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.**



प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, राज्यात सध्या तमाशा सुरु असून महाराष्ट्राचा तमाशा करण्याचे हे पाप भारतीय जनता पक्ष जाणीवपूर्वक करत आहे. भाजपाने महाराष्ट्राला कलंक लावला असून शाहु, फुले, आंबेडकर यांच्या पुरोगामी विचाराचा महाराष्ट्र आज कुठे नेऊन ठेवला आहे ? असा प्रश्न पडला आहे. राज्यात सध्या जे सुरु आहे ते महाराष्ट्राला भूषणावह नाही. राज्यातील सरकार अस्थिर असून हे सरकार कधी जाईल हे सांगता येत नाही. मलईदार खाती कोणाला मिळावीत यासाठी मारामारी सुरु आहे. कोणाला कोणते खाते मिळावे यात राज्यातील जनतेला स्वारस्य नाही. केंद्रातील भाजपा सरकार ईडी, सीबीआयची भिती दाखवून विरोधकांना दाबण्याचा प्रयत्न करत आहे. राज्यातील काही भागात अजून पेरण्या झालेल्या नाहीत तर काही भागात दुबार पेरणीचे संकट आहे. शेतकऱ्यांना मदत जाहीर करुनही ती मिळालेली नाही. कृषी मंत्री बोगस पथक पाठवून लुटण्याचे काम करत आहेत. शेतकरी आत्महत्या वाढल्या आहेत, महागाई, बेरोजगारी, जनतेच्या प्रश्नावर सत्ताधारी पक्ष बोलत नाहीत, जनतेला वाऱ्यावर सोडून देण्यात आलेले आहे. काँग्रेस पक्ष जनतेच्या प्रश्नावर पावसाळी अधिवेशानात सरकारला जाब विचारेल, असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

## शिंदेंच्या मुख्यमंत्रिपदाला धोका



अजित पवारांसह राष्ट्रवादी काँग्रेसचे ४० आमदार शिंदे–फडणवीस सरकारमध्ये सामील झाल्यामुळे महायुतीत मंत्रीमंडळ विस्ताराचा पेच निर्माण झाला आहे . आपल्या पारड्यात जास्तीत जास्त मंत्रीपदं मिळावीत, यासाठी भाजपासह शिंदे गट आणि अजित पवार गटाकडून हालचाली वाढल्या आहेत . अशा राजकीय हालचाली सुरू असताना राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांनी मोठं विधान केले आहे . आगामी काळात एकनाथ शिंदेंच्या मुख्यमंत्री पदाला धोका आहे, असे विधान खडसे यांनी केले . जळगाव येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना एकनाथ खडसे पुढे म्हणाले, भाजपा नेहमीच अफवा पसरवण्याचं काम करते . काही वेळा डाव टाकण्याचाही प्रयत्न करतात . सध्या भाजपा सत्तेसाठी हपापलेली दिसतेय . पक्ष फोडणे हेच देवेंद्र फडणवीसांचे प्रथम कर्तव्य आहे, असे दिसत आहे . स्वत :च्या पक्षावर लक्ष देण्यापेक्षा फोडाफोडीच्या राजकारणावर देवेंद्र फडणवीस यांनी अधिक लक्ष दिलं आहे . त्यामुळे काँग्रेस फोडता येईल का ? अपक्ष जोडता येईल का ? राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष तोडता येईल का ? असं फोडाफोडीचे राजकारण ते करत आहेत . भविष्याच्या राजकारणाच्या दृष्टिने हे योग्य नाही . मुख्यमंत्रीपदासाठी अजित पवारांच्या नावाची चर्चा आहे, यावर प्रतिक्रिया देताना एकनाथ खडसे म्हणाले, भावी काळात एकनाथ शिंदे यांच्या मुख्यमंत्रीपदाला धोका आहे . एखाद्या वेळी एकनाथ शिंदे हे अपात्र ठरले तर त्यांच्या जागी अजित पवार हे मुख्यमंत्री झाल्यास आश्चर्य वाटणार नाही .

## चर्चेतली बातमी

# कोळसा घोटाळाप्रकरणी विजय दर्डा दोषी

आधुनिक केसरी न्यूज



**नवी दिल्ली :** दिल्लीतील विशेष न्यायालयाने गुरुवारी कोळसा घोटाळाप्रकरणी मोठा निर्णय दिला आहे. दिल्ली न्यायालयाने छत्तीसगडमधील कोळसा खाण वाटपातील प्रकरणात माजी खासदार विजय दर्डांसह सर्व आरोपींना दोषी ठरवले. यात राज्यसभेचे माजी खासदार विजय दर्डा, त्यांचा मुलगा देवेंद्र दर्डा, कोळसा विभागाचे माजी सचिव एच. सी. गुप्ता, के. एस. क्रोफा आणि के. सी. सामरिया, जेएलडी यवतमाळ एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड आणि त्यांचे संचालक मनोज कुमार जयस्वाल इत्यादींचा समावेश आहे. विशेष न्यायाधीश संजय बंसल यांनी हा निकाल दिला. न्यायालयाने सर्व आरोपींना भारतीय दंड संहितेच्या कलम १२० ( ब ) – गुन्हेगारीस्वरुपाचे षडयंत्र, कलम ४२० – फसवणूक या कलमांखाली दोषी ठरवले, असे असले तरी न्यायालयाने आरोपींना कलम ४०९ – सरकारी कर्मचाऱ्यांकडून होणारा गुन्हेगारी स्वरुपाचा विश्वासघात या आरोपातून मुक्त केले. दरम्यान, सीबीआयने न्यायालयाने सांगितले होते की, जेएलडी यवतमाळ एनर्जी लिमिटेडला छत्तीसगडमधील पूर्व फतेहपूर कोळसा खाणी मिळाल्या होत्या. हा एका षडयंत्राचा भाग होता. यात पात्रतेच्या निकषांचा चुकीचा अर्थ काढण्यात आला. तसेच अर्जांमध्ये चुकीचे दावे करण्यात आले. सीबीआयने दिलेल्या माहितीनुसार, आतापर्यंत आरोप सिद्ध झालेले हे १३ वं प्रकरण आहे.

# अक्राळे एमआयडीसीमुळे दिंडोरी तालुक्याचा होणार कायापालट

## सहा हजार कामगारांच्या रोजीरोटीची होणार सोय, पदवीधारकांना नोकरीची आशा

आधुनिक केसरी न्यूज

बंडू खडांगळे


लखमापूर : अक्राळे येथे औद्योगिक क्षेत्राची उभारणी कार्यरत झाली आहे. या एमआयडीसीमध्ये 5700 कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली आहे. मल्टीनॅशनल कंपन्यांच्या नियोजीत प्रकल्पांमुळे दिंडोरी तालुक्याच्या आर्थिक कक्षा रुंदावणार असून मोठे औद्योगिक हब नावारुपास आल्याने तालुक्याचा सर्वार्थाने कायापालट होणार आहे. दिंडोरी तालुक्यात लखमापूर, पालखेड एमआयडीसी असून उर्वरीत काही ठिकाणी औद्योगिक कंपन्या जागा उपब्धततेनुसार स्थिरावल्या आहेत. तालुक्यात जमिन, पाणी, वातावरण, वाहतूक व्यवस्था अशी अनुकुलता औद्योगिक क्षेत्रासांठी आहे त्यात महाराष्ट्र व गुजरात राज्य या दोन्ही तालुक्यांना जोडणारा कमी अंतराचा व कमी वेळेचा राष्ट्रीय महामार्ग वणीपासुन सुरु होतो. दिंडोरी -नाशिक रस्त्यावर मध्यवर्ती ठिकाणी अक्राळे एमआयडीसीमुळे विकासाला वेग येणार असून मल्टीनॅशनल कंपनीच्या गुंतवणुकीमुळे खऱ्या अर्थाने विकासची गंगा अवतरणार आहे. अक्राळे औद्योगिक क्षेत्रातील प्लॉटच्या किमती गगनाला भिडल्या आहेत. तर परीसरातील जमीनीला सोन्याचा भाव आला आहे. औद्योगिक कंपन्यामुळे मोठा महसुल शासनाला प्राप्त होणार आहे. तत्सम



संलग्न उद्योगव्यवसाय त्यात हाटेल्स, पेट्रोलपंप, लाजींग, ट्रान्सपोर्ट, इंजिनीयीयरींग वर्कशाप, निवासी अपार्टमेंटस बंगलोज व इतर अनेक व्यवसाय यांना सुगीचे दिवस येणार असून तालुक्याचे अर्थचक्र गतिमान होणार आहे. अक्राळे औद्योगिक वसाहतीमध्ये वर्षात 5700 कोटींची गुंतवणूक तालुक्यातील अक्राळे औद्योगिक वसाहतीमध्ये वर्षभरात रिलायन्स लाईफ सायन्सेस व इंडियन ऑईल कॉर्पोरेशन यांनी गुंतवणूक केल्यानंतर आता इतर जवळपास २९ उद्योगांनी तेथे गुंतवणूक केली आहे. यामुळे अक्राळे औद्योगिक वसाहतीमध्ये आतापर्यंत ५,७०० कोटी रुपयांची गुंतवणूक झाली असून, त्या माध्यमातून 6000 जणांना प्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होऊ शकणार आहे. नाशिकमधील सातपूर आणि अंबड या दोन औद्योगिक वसाहतींमध्ये उद्योगांसाठी सध्या जागा उपलब्ध नाही. यामुळे भविष्याचा वेध घेत एमआयडीसीने नाशिकपासून अवघ्या १७ किलोमीटर अंतरावर दिंडोरी तालुक्यातील अक्राळे येथे अतिरिक्त औद्योगिक वसाहत उभारली आहे. रिलायन्स लाइफ सायन्सेस या रिलायन्स उद्योग समूहाच्या कंपनीने येथे कोव्हिड १९ च्या काळात बाराशे कोटी रुपये गुंतवण्याचा सामंजस्य करार केला. अलिकडच्या काळात नाशिकमध्ये आलेला हा सर्वात मोठा उद्योग आहे. या उद्योगासाठी महाराष्ट्र औद्योगिक वसाहतीने अक्राळेत १६० एकर जमीन उपलब्ध करून दिली असून अहोरात्र कामही सुरू आहे, त्यानंतर इंडियन ऑईल कॉर्पोरेशननेही अक्राळेत ३५० कोटींची गुंतवणूक करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यासाठीही एमआयडीसीने ६० एकर जागा उपलब्ध करून दिली आहे. या दोन मोठ्या उद्योगांच्या गुंतवणुकीमुळे अक्राळे हे उद्योगांसाठी एक आकर्षण केंद्र झाले आहे. यातून या दोन उद्योगांव्यतिरिक्त २९ लहान मोठ्या उद्योगांनी येथे गुंतवणूक केली आहे. यामुळे केवळ वर्षभरात अक्राळे येथे ५७०० कोटींची गुंतवणूक झाली आहे. या उद्योगांमुळे अक्राळे औद्योगिक वसाहतीमध्ये 6000 रोजगार तरुणांना उपलब्ध होणार आहेत.

**अक्राळेतील प्रमुख गुंतवणूकदार उद्योग**
- रिलायन्स लाइफ सायन्सेस– १२०६ कोटी
- इंडियन ऑइल कॉर्पोरेशन– ३५० कोटी
- प्लान्सस्केअर प्रोकॉन प्रा . लिमिटेड– ९२५ कोटी
- राज इंडस्ट्रीज – १६५ कोटी
- जोगेश्वरी एंटरप्रायझेस– १२० कोटी
- श्री महालक्ष्मी इंडस्ट्रीज– १४५ कोटी
- पाटील प्लास्ट– ४०५ कोटी
- तिरूपती इंजिनिअरिंग– २०० कोटी
- मोटेक्स ग्लास फायबर लिमिटेड– ५० कोटी


## उगवतीचे रंग




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

तकदीर ता हिंदी चित्रपटात एक सुंदर गाणं आहे. ' आईये बहार को हम बाट ले , जिंदगी के प्यार को हम बाट ले. ' असं खरंच प्रत्यक्षात झालं तर...! इंग्रजी माध्यमांच्या आणि भरमसाठ फी घेणाऱ्या शाळांचे पेव फुटले आहे. पुण्यातील एका शाळेची दुसऱ्या तिसऱ्या वर्गाची वार्षिक फी चक्क पंचाहत्तर हजार रुपये आहे. अर्थात बालवाडी किंवा नर्सरीपासून यापेक्षाही जास्त फी घेणाऱ्या शाळा आहेतच ! मला वाटतं एवढी फी पूर्वी फार तर मेडिकल, इंजिनिअरिंगला असायची. एवढे सगळे करूनही त्या शाळा काय शिकवतात, विद्यार्थ्यांवर कोणते संस्कार करतात याचाही प्रश्न पडतो. या शाळा विद्यार्थ्यांना एवढा प्रचंड गृहपाठ देतात की रोज त्यांच्या पालकांना त्याकडे लक्ष देऊन तो गृहपाठ करून द्यावा लागतो. मग आमच्या सरस्वती प्राथमिक विद्या मंदिर, शारदा विद्या मंदिर वगैरे असे नाव असलेल्या मराठी माध्यमाच्या शाळा काय वाईट आहेत ? पण असल्या नावांच्या शाळांना प्रतिष्ठा नाही. ' फ्रावशी, डून, गुड शेफर्ड, केम्ब्रिज, एन्जेल्स, ग्रीनवूड यासारख्या शाळांचा विद्यार्थी असला तर तो उत्तम !
आज खरे तर हे चक्र उलट फिरवण्याची गरज आहे. इंग्रजी माध्यमांच्या शाळातून मुलांना काढून मराठी माध्यमात शिकवायलाच हवे. अशा अधिकाधिक शाळा निघतील, आणि त्यांचा दर्जा उत्तम राहील यासाठी शासनावर दबाव आणायला हवा. फुकटचे वही पुस्तके,पोशाख इ. गोष्टी देण्यापेक्षा मराठी शाळातून उत्तम आणि संस्कारयुक्त शिक्षण कसे मिळेल याकडे शासनाने लक्ष द्यायला हवे. पालकांनी त्यासाठी शासनाला भाग पाडायला हवे. शिक्षण ही राष्ट्राची भविष्यकाळासाठी केलेली गुंतवणूक आहे या दृष्टीनेच त्याकडे पाहायला हवे. त्यासाठी शिक्षणासाठीचा अर्थसंकल्पातील निधी वाढायला हवा. डॉ रघुनाथ माशेलकरांसारखे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शास्त्रज्ञ अशाच मराठी शाळातून शिकले होते. अर्थात त्यांचे नाव उदाहरण म्हणून घेतले. अशी अनेक उदाहरणे आहेत. गुणवंत विद्यार्थ्यांना समाज धुरिणांनी एकत्र येऊन उत्तेजन द्यायला हवे. गरीब आणि विपरीत परिस्थितीत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची जबाबदारी समाजाने आणि शासनाने घ्यायला हवी. विद्यार्थ्यांची जात पात न पाहता केवळ एक विद्यार्थी म्हणून आपण जेव्हा त्याच्याकडे पाहायला लागू त्या दिवशी खरी सामाजिक समरसता येईल. शाळांनीही केवळ अभ्यासक्रम पूर्ण करण्यावर आणि गुणांच्या शर्यतीत धावणारे परीक्षार्थी तयार करण्यापेक्षा प्रेम, आदर, सहकार्य, बंधुभाव, देशप्रेम, श्रमप्रतिष्ठा आदींचे मूल्य जाणणारे भविष्यातील नागरिक कसे घडतील याकडे जास्त लक्ष द्यायला हवे. मग आपण खरंच अभिमानाने म्हणू शकू, ' मी प्रतिज्ञा करतो की सारे भारतीय माझे बांधव आहेत ' या प्रतिज्ञेतील शब्दांना तेव्हाच खरा अर्थ प्राप्त होईल.


प्रतिज्ञा
भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत. माझ्या देशावर माझे प्रेम आहे.
माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.
मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या

## मी प्रतिज्ञा करतो की...



## आनंदी पहाट

# केवळ सुशिक्षित नव्हे, तर सुरक्षित राहणे गरजेचे

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या साधनालाच आपलं साध्य समजू लागलेल्या प्रत्येकाचा विचार, वर्तन आणि व्यवहार अभ्यासला तर असं लक्षांत येईल कि, केवळ पैसा मिळवणं हेच उद्दिष्ट त्यांचं असतं. तो कोणत्या मार्गानं, कोणत्या पद्धतीनं, किती हुशारीनं, कष्टानं, किती इमानदारीनं मिळवला ह्याकडे दुर्लक्ष होऊ लागल्याचं खेदजनक चित्र अनेक ठिकाणी अनेकांच्या बाबतीत दिसून येत असतं. आपल्याला काय आणि किती हवंय ह्याची देखील जाणीव असणं जरुरीचं असतं. सद्यःस्थितीत सोशल मिडिया, स्मार्ट फोन, मोबाईल नेटवर्क ह्यामुळे जनसंपर्क खूपच जलद होऊ लागला आहे. तंत्रज्ञान, संगणकीकरण, आधुनिकीकरण ह्याचा परिणाम जनमानसावर प्रचंड प्रमाणत झाला आहे. ह्याचा जितका उपयोग, फायदा होऊ लागला आहे, तितकाच त्याचा तोटा, नुकसान, फसवणूक होण्याचं प्रमाणही खूपच वाढत चाललं असल्याचं आपण अनुभवत आहोत. ह्या फसवणुकीच्या घटनांमुळे आपण सावध होत नाहीत, सतर्क रहात नाहीत. सुशिक्षित व्यक्तीच ह्यामध्ये मोठ्या रकमेच्या फसवणुकीच्या बळी पडल्याच्या घटना सतत घडत राहतात. झटपट श्रीमंती हा त्या घटनांच्या मागील उद्देश असतो. ह्यांत बळी पडलेली आणि फसवणूक करणारी व्यक्ती परिणामांची जाणीव करून घेऊ शकत नाही. सोशल मिडीयाच्या माध्यमातून आर्थिक फसवणूक झाल्याच्या अनेक घटना सातत्याने घडत असूनही आपण सावध न झाल्यामुळे सावज होत आहोत, त्याचे बळी पडत आहोत. फेसबुकच्या माधमातून मैत्री करून आर्थिक फसवणूक, प्रत्यक्ष भेटून मानसिक आणि शारीरिक शोषण, अत्याचार घडत असल्याचं सातत्याने आपण ऐकत, वाचत असतो. काहीवेळा तर काही जणांना स्वतःचा जीव देखील गमवावा लागल्याचं उघड झालं आहे. फसवणूक होण्याइतके आपण अज्ञानी असतो का ? कशाचीच जाणीव का होत नाही अशावेळी ?



आधुनिक केसरी

### तूच न्याय करी | विठुराया ||

उपदेश आता | करावा कुणाला ||
शिष्य जो बैसला | गुरू स्थानी ||१||
मुर्खाने मांडला | ज्ञानाचा बाजार ||
शाहणा बेजार | पदोपदी ||२||
उलटे हे चक्र | फिरे कलयुगी ||
दांभिक हा भोगी आनंदाचा ||३||
सज्जनांच्या माथी | सदा वणवण ||
नाही समाधान | क्षणभर ||४||
सोसवेना आता | मुर्खाची मुजोरी ||
तूच न्याय करी | विठुराया ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

कल्याणं करणीयं मे देवेन्द्रस्य यथा कृतम् | अभीष्टफललाभाय दुर्गां देवीं नमाम्यहम् || ४२ || जसे पूर्वी देवेंद्राचे केलेस, तसे माझे कल्याण तू करावेस. तुला दुर्गा देवीला मी अभीष्टफलाच्या प्राप्तीसाठी नमन करतो.

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

काम कोई करते रहें, प्रेम धार प्रभु लाग ।
चलत फिरत टूटे नहीं, प्रेम उदय वड़ भाग
।।१४।।(स्वर्वेद पंचम मण्डल चतुर्थ अध्याय)
०५/०४/१४

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
कुठलंही काम करत असतानाही प्रेमधारा सतत परमेश्वराशी संलग्न असली पाहिजे. चालता-फिरता, उठता-बसता ही धारा तुटता कामा नये. असं प्रेम हे मोठ्या पुर्वपूण्याईचं फळ आहे.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## दुश्चीतनिरूपण

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

म्हणजेच सततची सत्कर्माची आराधना करावी जर लक्षात रहात नसेल तर परत परत त्याविषयी चिंतन मनन करावे. त्यासाठी आळस त्रागा करू नये किंवा मला समजत नाही म्हणून सोडूनही देऊ नये. याठिकाणी माणुस व पाषाण यांचे विवेचन केले आहे. एक दगड आहे तो पाथरवटाने वाकडातिकडा फोडला आहे .त्याला टाकीने घाव घालून परत नीट केला. परत बघितल्यावर तो जसा होता तसाच आहे टाकीचा घाव घालून दगडाची छिन्नी हातोड्याने घाव घालून खपली तर काढली आहे ती परत बसवायची म्हणले तर दगडाला ती चिकटत नाही. यावेळी माणसाच्या व दगडा सारख्या निर्जीव वस्तूचीतुलना केली आहे कशी ते पाहू. आपण मनुष्याच्या जन्माला आलेलो आहोत,आपल्याला बुध्दीचे वरदान मिळालेले आहे. एखाद्या माणसाला त्याचा दोष अवगुण समजावून दिला तर तो तेवढ्या पुरता कमी होतो पण परत तो तसेच अवगुण करतो. पण पाषाणाचे असे होत नाही. म्हणून माणसा पेक्षा दगड बरा असे म्हणायची वेळ येते. आता आपण यासमासातील गुरू शिष्य संवादाकडे वळूया. ब्रम्हवस्ण निर्गुण आहे तशीच ती सनातन म्हणजे कायम टिकणारी आहे. आपण याआधीही पाहिले आहे की आकाशाचे सात स्वभाव धर्म आहेत. किंवा आपण त्याला गुण असेही म्हणू शकतो. काम, क्रोध, शोक, मोह,भय, अज्ञान आणि आपण आताच जे अभ्यासले तो गुण म्हणजे शून्यपणा होय. आकाश हे पंचमहाभूतापैकी एक आहे. उलट ब्रम्हस्वरूपामध्ये निर्विकारपणा आढळतो.

# जेथे नामाचे स्मरण तेथे माझे वसतिस्थान


आधुनिक केसरी

प्रत्येक माणूस या ना त्या मार्गाने समाधान शोधत असतो. पण सुख दुःखाचे हेलकावे देणे हा प्रपंचाचा मूळ स्वभाव असल्याने त्याच्या आहारी जाणाऱ्या माणसाला प्रापंचिक यश मिळून सुद्धा जीवनाच्या अखेर पर्यंत समाधान मिळत नाही. नुसता प्रपंच चांगला करणे हे काही मनुष्यजन्माचे ध्येय नाही. जनावरे देखील आपापला प्रपंच करतात. आपल्या खऱ्या स्वरूपाचा म्हणजे भगवंताचा विसर पडणे हे सर्व असमाधानाचे मूळ आहे. मनुष्याने भगवंताची उपासना करून त्याची प्राप्ती करून घेतली, तरच प्रपंचातील कष्टांचे सार्थक होते. असे श्रीमहाराजांचे अनुभवसिद्ध मत आहे.

अंतःकरण शुद्ध होऊन पूर्ण समाधानाचा व खऱ्या आनंदाचा साक्षात्कार होण्यासाठी संताची संगत व भगवंताचे नाम हे दोनच उपाय प्रापंचिकाच्या पचनी पडतात. त्यातदेखील संताची संगत मिळणे व टिकणे कठीण असते. परंतु नामस्मरणाला कसलीही अट नाही, कसलेही बंधन नाही, त्यातच सत्संगती लाभते व भगवंताचे चिंतन आपोआप घडते. चिंतनातून अनुसंधान उदय पावते आणि अनुसंधान पक्के झाले की स्वतःच्या हृदयात भगवंताचे दर्शन घडते. हे श्रीमहाराजांच्या उपदेशाचे सार आहे.

प्रपंचामध्ये का होईना, पण निष्कपट प्रेम करावयास शिकणे हे भगवंतावर प्रेम करावयास शिकण्याची पहिली पायरी आहे. घरच्या माणसांना दीनवाणे व कष्टी कधी ठेवू नये, त्यांची आबाळ कधी करू नये, असे सांगून श्रीमहाराज म्हणत की ज्या प्रपंचात राम नाही त्या प्रपंचात आराम होणार नाही! नवराबायकोमध्ये, आईबाप व मुलांच्यामध्ये, भाऊबहिणींच्यामध्ये निष्कपट प्रेम असले तर त्यांना त्याचे विशेष कौतुक वाटायचे. सासू-सून प्रेमाने राहिल्या तर ते दोघींचीही स्तुती करीत. 'आपला परमार्थ हा प्रपंचात मिसळला पाहिजे. प्रपंच करीत असताना कर्तव्याची जागृती राखून त्यामध्ये भगवंताची अखंड स्मृती ठेवली तर कोणालाही समाधानाची प्राप्ति होऊ शकते.' असे महाराजांचे सांगणे आहे.

श्रीमहाराज सांगत,' बाळ, भगवंताने प्रपंचामध्ये ज्या परिस्थितीत आपल्याला ठेवले आहे, तिच्यामध्ये समाधान मानावे आणि त्याच्या नामाला कधी विसरू नये. जो नाम घेईल त्याच्यामागे राम उभा आहे, नाम घेणाऱ्याचे राम कल्याण करतो. एवढे माझे सांगणे शेवटपर्यंत विसरू नका.'



## सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

कित्येक लोक तिच्या जवळून गेले पण एकानेही ढुंकून पहिले नाही. तिला वाटलं makeup मध्ये काही गडबड असेल. म्हणून पुन्हा नीट आवरून आली. पुन्हा तोच प्रकार. आता मात्र ती विचार करू लागली भर तारुण्यात , इतकं सौंदर्य जवळ असतानाही हि गत तर म्हातारपणी कुरुपपण आल्यावर कसं होणार. आणि खाडकन तिचे डोळे उघडले. सगळा पैसा दान करून हि गंगेच्या तीरावर तपस्या करायला गेली. पुढे फार मोठी योगिनी बनून इतरांनाही मार्गदर्शन करू लागली. लोकांना हजारदा सांगूनपण त्यांच्यात काहीच बदल घडत नाही. आणि आयुष्यभर विषय वासनेत गुरफटलेली वेश्या मात्र एका क्षणात वैरागी होऊ शकते . कामी पुरुषाच्या प्रतिक्षेत जगण्या पेक्षा देवासाठी जर जागले तर त्याची प्राप्ती तरी होईल .कामोपभोगेच्छां सर्वात मोठे दुःख आहे. हेच दत्तगुरूंनी तिला गुरु मानायचं कारण आहे. (१८) कुररी पक्षि :- संग्रह करण्या पेक्षा त्याग करावा (१९) बालकः- निरागस भाव ग्रहण करणे

क्रमशः

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

अजरामरवत् प्राज्ञो विद्यामर्थं च साधयेत् ।गृहीत इव केशेषु मृत्युना धर्ममाचरेत् ।।

सरलार्थ - शहाण्या माणसाने आपण अजरामर आहो, अशा भावनेने विद्या आणि धन मिळवीत रहावे. (मात्र ) मृत्यूने आपले केस धरले आहेत, या भावनेने धर्माचरण करावे.

स्पष्टीकरण - माणसाने आयुष्याच्या अखेरीपर्यंत विद्या आणि घन मिळवीत राहावे. कारण ती विद्या आपल्या बुद्धीचा विकास करते आणि ते धन सत्कृत्यांसाठी उपयोगी पडते. धर्माचे म्हणजे दानादी पुण्यकृत्यांचे आचरण मात्र तातडीने करावे. कारण मृत्यू आपल्यावर केव्हा घाला घालील याचा नेम नसतो.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे




राजकारणातली निष्ठा, नीतिमूल्ये, हिंदुत्व, पुरोगामीत्व वगैरे या सगळ्यांचं काय झालं ? पान ६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शुक्रवार, १४ जुलै २०२३



दुबार पेरणी... पान ७




# चाळीतील कांदा गेला सडून; त्यामुळे उकीरड्यावर दिला फेकून

आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**लोणी खुर्द :** खरीप हंगाम भांडवल तसेच घरखर्चासाठी चार पैसे मिळतील या आशेवर चाळीत साठवून ठेवलेल्या कांद्यास कवडीमोल दर मिळत आहे. उत्पादन खर्चापेक्षा कितीतरी पटीने तोटा सहन करावा लागत आहे. त्यातच गेल्या काही दिवसात वातावरणातील बदलामुळे तसेच पावसामुळे साठवून ठेवलेला चाळीतील हजारो क्विंटल कांदा सडून गेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना नाईलाजास्तव तो उकीरडयावर फेकून द्यावा लागत आहे. शासनाने हमी भावाने कांदा खरेदी करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी शेतकरी वर्गातुन होत आहे.कांद्याचे थोडेफार वाढले असले तरी प्रत्यक्षात ह्या भाववाढीचा वैजापुर तालुक्यातील शेतकऱ्यांना फारसा फायदा होणार नाही. साठवलेल्या उन्हाळ कांद्यापैकी चाळीस टक्के कांदा चाळीत च सडला आहे.काही कांदा कवडीमोल भावात विकला.काद्यांच्या भाववाढीने तालुक्यातील शेतकऱ्यांना अजिबात आनंद नाही. भाववाढी अगोदरच बहुतांश कांदा उकीरड्यावर गेला आहे. कांद्याचे माहेर घर असलेल्या वैजापुर तालुक्यात मागील वर्षी मोठ्याप्रमाणावर उन्हाळ कांद्याची लागवड झाली बहुतांश कांदा शेतकऱ्यांनी काढणीनंतर चांगला भाव मिळेल या अपेक्षेने चाळीत साठवला होता.मात्र प्रचंड उष्णतेमुळे बहुतांश कांदा चाळीत च सडला. पोटच्या पोरासारखा सांभाळलेला कांदा सडलेला पाहून बळीराजा हताश झाला. सडलेला कांदा उकीरड्यावर फेकून द्यावा लागला. उरला सुरला कांदा सडण्याच्या भितीने कवडीमोल भावातच विकावा लागत आहे.

पोटच्या पोरासारखा सांभाळलेला चारशे क्विंटल कांदा चाळीत साठवला .त्यातील अडीचशे क्विंटल कांदा सडल्याने उकीरड्यावर फेकावा लागला .काही कांदा कवडीमोल भावात विकला . **वसंत मगर शेतकरी तलवाडा**

**हेच का आच्छे दिन**

गाडीभाडेही सुटत नसल्याने साठवण केलेला कांदा थेट शेतात व उकिरडयावर फेकून देत आहेत . शासनाने जुलै–ऑगस्टमध्ये विक्री झालेल्या कांद्याला १०० रुपये प्रतिक्विंटल अनुदान देण्याचे जाहीर केले होते . मात्र अजूनही त्याचा प्रत्यक्ष कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मिळाले नाहीत हेच का आच्छे दिन . **तातेराव जाधव शेतकरी तलवाडा**

# ‘संपर्क से समर्थन’ यशस्वी झाला आणि नवा सहकारी मिळाला

आधुनिक केसरी न्यूज

**ठाणे :** नव्या सरकारला एक वर्ष झाले आहे. ‘संपर्क से समर्थन’ हा आपला कार्यक्रम यशस्वी झाला आणि आपल्याला एक नवा सहकारी मिळाला, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. भाजपचे भिवंडीत गुरुवारी एकदिवसीय शिबिर आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाषण केले. यावेळी त्यांनी विरोधकांवर सडकून टीका केली. त्यांनी भाजप पक्षाच्या राजकीय प्रवासाविषयी माहिती सांगितली. तसेच पक्ष आता पुढे कशी वाटचाल करेल, पक्षाचे महाराष्ट्रात आणि देशात पुढचे धोरण काय असेल ? याबाबत माहिती दिली. यावेळी त्यांनी ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला. तसेच त्यांनी जम्मू-काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री आणि पीडीपी प्रमुख मेहबूबा मुफ्ती यांच्याबद्दल मोठे वक्तव्य केले. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आधी ऊर्जामंत्री होते. त्यांनी खूप ऊर्जा स्वतः कडे ठेवली आहे, जे नेहमी सर्वांना ऊर्जा देत असतात. भाजपचा प्रवास हा इतिहासात पाहिला तर हा प्रवास विरोधापासून सुरू झाला तो उपाहासापर्यंत पोहचला. ज्या पक्षाला केवळ दोन सदस्य निवडून आले म्हणून चिडवले गेले. त्याच पक्षाने 2 पासून 300 पर्यंत मजल मारली. जनसंघ ते भाजप हा जो आपला प्रवास आहे यात अनेकवेळा अन्याय, उपाहास, विष, पचवले आहे. हे आपण का करु शकलो ? कारण आपल्या कार्यकर्त्यांमध्ये संयम होता आणि नेतृत्वावर विश्वास होता, असे फडणवीस म्हणाले.

देशाकरीता मेहबूबा मुफ्तिसोबत जावे लागले. कारण तेव्हा ती आवश्यकता होती. काही लोकांनी टीका केली. पण आवश्यकता संपली तेव्हा लात मारून बाहेर काढण्याचे कामपण केले. कारण काश्मीरमधील कलम 370 आपल्याला घालवायचे होते. अंतिम स्वप्न तेच होते. अजून पाकव्याप्त काश्मीर बाकी आहे ते आपले अंतिम ध्येय आहे, असे देवेंद्र फडणवीस आपल्या भाषणात म्हणाले. आपला मंत्र, विश्वास पक्षावर, नेतृत्वावर, क्षमतेवर यावरच भाजप मोठा झालाय. आता आपल्याला विष पचवायचे नाहीय. पण महाविजयासाठी कडू औषध जरी घ्यायची गरज पडली तर घ्यायचे. आपल्याला संयमाची गरज आहे. नेहमी विचार दूरचा करायाचा असतो, त्यासाठी संयम आणि विश्वास आवश्यक आहे, असा सल्ला देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांना दिला.

# ‘पीओपी’च्या गणेशमूर्ती बनविण्यास बंदी

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** पिंपरी-चिंचवड शहरात गणपती मूर्ती बनवणारे कारागीर, मूर्तिकार व उत्पादक यांना प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती बनविण्यावर बंदी घालण्यात आली आहे. मूर्ती बनविल्यास कायदेशीर कारवाईचा इशारा आयुक्त व प्रशासक शेखर सिंह यांनी दिला आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती उत्पादनावर बंदी घालण्यात आली आहे. सर्व कारागीर, मूर्तिकार तसेच उत्पादकांनी केवळ पर्यावरणपूरक शाडूच्या मातीच्या नैसर्गिक रंग वापरून पाण्यात सहज विरघळणाऱ्या मूर्तींची निर्मिती करावी.

# वनवासी कल्याण आश्रम शाळेत वृक्षारोपण



आधुनिक केसरी न्यूज

**माणगाव :** पोस्को महाराष्ट्र स्टीलने माणगांव स्थित वनवासी कल्याण आश्रम शाळेत, जिथे ४५० पेक्षा अधिक वनवासी गटातील जनजातीय मुले पहिली ते दहावी पर्यंतचे शिक्षण निवासी पद्धतीने घेतात तिथे काही मूलभूत गरज लक्षात घेऊन मुलींच्या वसतिगृहास बंक बेड तसेच मुलां-मुलींकरिता वॉशिंग व ड्रायर मशीन प्रत्येकी एक संच असे मागील वर्ष २०२२ मध्ये व्यवस्थात्मक काम केले. वरील काम पाहायला कंपनी प्रशासनाचे भारतातील प्रमुख व काही अधिकारी यांनी पाहणी करत समाधान व्यक्त केले व या निमित्त वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. वनवासी कल्याण आश्रम संस्था व शाळा खूप सकारात्मक काम करत आहे, शिक्षण व ज्ञानाने मागे पडलेल्या समाजाला आपण पुढे आणण्याचा अथक प्रयत्न करत आहात असे म्हणत पुढील काळातही शाळेच्या काही मूलभूत गरजांसंदर्भात चर्चा झाली व पोस्को कंपनी या बद्दल सकारात्मक विचार करेल असे कंपनी प्रतिनिधींनी वरील प्रसंगी मत प्रदर्शित केले व संस्थेला शुभेच्छा दिल्या.

# अधिक श्रावण मासानिमित्त नांदेड येथे संपन्न होणाऱ्या शिवनाम सप्ताहात हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे

## डॉ. विरुपाक्ष शिवाचार्य महाराज मुखेडकर

आधुनिक केसरी न्यूज



**बाबूराव गोणारकर**

**धर्माबाद :** राष्ट्रसंत सद्गुरू शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर यांच्या प्रेरणेने नांदेड अर्धापूर महादेव पिंपळगाव पाटी अर्धापूर येथे संपन्न होणाऱ्या अधिक श्रावणमास सर्व धर्मीय शिवनाम सप्ताह हजारोच्या संख्येने भक्तांनी सहभागी व्हावे असे आव्हान डॉक्टर विरुपाक्ष शिवाचार्य महाराज मुखेडकर यांनी काल महात्मा बसवेश्वर महाराज अनुभव मंडप बसवन्ना हिल्स धर्माबाद येथे केले आहेण् या कार्यक्रमासाठी व्यासपीठावर अनेक शिवाचार्य महाराज यांची उपस्थिती होती ज्यामध्ये सोम लिंग शिवाचार्य महाराज बिचकुंदेकर बसवलिंग शिवाचार्य महाराज मांजरसुंबा कौलासकर महाराज व इतर शिवाचार्य यांची उपस्थिती होती. महात्मा बसवण्णा हिल्स येथे धर्माबाद तालुक्यातील लिंगायत समाजाने आयोजित केलेल्या बैठकीमध्ये गुरुवर्यांचं पूजन व स्वागत करण्यात आले. त्यानंतर सद्गुरु डॉक्टर विरुपाक्ष शिवाचार्य महाराज यांनी नांदेड येथे संपन्न होणाऱ्या अधिक श्रावण मास सप्ताहाची नियोजनाची माहिती उपस्थितींना दिली या ठिकाणी तेलंगाना महाराष्ट्र आंध्र प्रदेश येथून हजारो भाविक भक्त उपस्थित राहणार असून सर्वांची राहण्याची जेवणाची व्यवस्था केलेली आहे या ठिकाणी सात दिवसांमध्ये विविध विषयावर धर्मसभा धर्मचिंतन होणार आहे. तरी सर्वांनी उपस्थित रहावे असे आव्हान डॉ.वीरूपाक्ष शिवाचार्य महाराज यांनी केले आहे.




# सोनिया गांधी पुन्हा सक्रिय

आधुनिक केसरी

काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांनी सक्रिय राजकारणातून बाजूला होण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, १७-१८ जुलै रोजी बंगळुरू येथे होणाऱ्या विरोधकांच्या दुसऱ्या बैठकीला उपस्थित राहण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. सोनिया गांधी यांच्या उपस्थितीमुळे विरोधकांचे ऐक्य करण्यासाठी काँग्रेस गंभीर असल्याचा संदेश दिला येईल. तसेच विरोधकांच्या गटाला औपचारिक स्वरूप देण्याची प्रक्रिया सुरू करण्यासाठी सोनिया गांधी यांची उपस्थिती अतिशय महत्त्वाची ठरणार आहे. विरोधी पक्षातील वरिष्ठ नेत्यांसोबत सोनिया गांधी यांची जवळीक आहे. विरोधकांमधून जे पक्ष एकत्र आले आहेत, त्यांच्यातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार- विरोधकांमधून अद्याप एकाही नेत्याचे नाव संयोजक म्हणून देण्यात आलेले नाही. बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार हे या पदासाठी इच्छुक असल्याचे म्हटले जाते. संयोजक पदाबाबत चर्चा झाल्यास सोनिय गांधी यांची उपस्थिती दोन प्रकारे कार्य करू शकते. एक तर काँग्रेसला विरोधकांचे नेतृत्व आणि एकसंध विरोधी गटाचा केंद्रबिंदू बनायचे आहे, हे गुपित राहिलेले नाही. काही पक्षांच्या नेत्यांचे काँग्रेससोबत फारसे सख्य नाही; अशा नेत्यांना आता सोनिया गांधी यांच्या उपस्थितीमुळे कुणाही नेत्याचे नाव संयोजक म्हणून देता येणार नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते शरद पवार यांच्यासह सोनिया गांधीही वरिष्ठ नेत्यांपैकी एक आहेत. तसेच आता अस्तित्वात नसलेल्या आणि काँग्रेसचा वरचष्मा असलेल्या संयुक्त पुरोगामी आघाडीचे (UPA) अध्यक्षपद सोनिया गांधी यांच्याकडे होते. काँग्रेसशी अनुकूल असलेल्या पक्षांकडून सोनिया गांधी यांना अध्यक्षपद देण्याचा प्रस्ताव दिला जाऊ शकतो आणि इतर वरिष्ठ नेत्यांकडे संयोजकपदाची जबाबदारी दिली जाऊ शकते. तर, दुसऱ्या बाजूला सोनिया गांधी याच एखाद्या बिगरकाँग्रेसी नेत्याचे नाव संयोजकपदासाठी सुचवू शकतात. सध्या या प्रकारच्या चर्चांची फक्त अटकळ बांधली जात आहे. बंगळुरू येथे होत असलेल्या बैठकीचे यजमानपद काँग्रेसकडे आहे. त्यामुळेच दोन दिवसांच्या या बैठकीला एका मोठ्या भव्य सोहळ्यात बदलण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी यावेळी काही लहान लहान पक्षांनाही निमंत्रण दिले आहे. त्यातून २०२४ च्या लोकसभा निवडणुकीसाठी भाजपाच्या विरोधात देशभरातील सर्व पक्ष एकत्र आले असल्याचा संदेश दिला जाऊ शकेल.
काँग्रेस पक्ष आणि गांधी कुटुंब यांचे कर्नाटक राज्याशी भावनिक बंध राहिले आहेत. इंदिरा गांधी (चिक्कमंगलुरू) आणि सोनिया गांधी यांनी त्यांच्या राजकीय कारकिर्दीतील महत्त्वपूर्ण लढती कर्नाटकमधून लढवल्या आहेत.
१९९९ च्या लोकसभा निवडणुकीत सोनिया गांधी यांनी राजीव गांधी यांच्या हत्येच्या दुःखातून स्वतःला सावरत निवडणुकीत उतरण्याचा निर्णय घेतला होता. त्यावेळी त्यांनी कर्नाटकमधील बेल्लारी मतदारसंघातून लोकसभा निवडणूक लढवली होती.

# ऑनलाइन गेम: एक घातक व्यसन



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**आपल्या देशात लहान मुले, किशोरवयीन आणि तरुणांमध्ये ऑनलाइन गेम खेळण्याचे व्यसन महामारीचे रूप धारण करत आहे. याला बळी पडलेले लोक चोवीस तास ऑनलाइन गेम खेळत असतात. आज सतत बदलणारे जग आणि रंगीबेरंगी थीमसह सतत वाढत जाणारे साहस आणि प्रत्येक इंटरनेटवर उपलब्ध रोमांचक ऑनलाइन गेममध्ये संगीताची साथ मुलांच्या मनावर आणि हृदयावर अधिराज्य गाजवत आहे.गेम खेळण्याचे हे व्यसन हळूहळू वाढत्या नैराश्यात बदलते.**

भारतातील तेवीस वर्षे वयापर्यंतचे ऐंशी टक्के तरुण वेळ घालवण्यासाठी ऑनलाइन गेम खेळतात. छंद म्हणून किंवा टाईमपास करण्यासाठी काही काळ ऑनलाइन गेम खेळणे ही वाईट गोष्ट नाही, पण ती वाईट सवय झाल्यावर समस्या निर्माण होते, ज्याला 'गेमिंग ॲडिक्शन' म्हणतात. ऑनलाइन गेम खेळण्यामुळे हिंसेचा ट्रेंडही वाढत आहे, कारण हे गेम अनेकदा हिंसक घटनांनी भरलेले असतात. यामध्ये मरण्या-मारण्याच्या गोष्टी आहेत, युद्धे आहेत, मुलांच्या हातात बंदुका आहेत.

कोरोना काळातील ताळेबंदीमुळे भारतात ऑनलाइन गेम खेळणाऱ्यांच्या संख्येत सातत्याने वाढ होत आहे, ज्यात लहान मुलांसह प्रौढांचाही समावेश आहे. 2018 मध्ये, भारतात ऑनलाइन गेम खेळणाऱ्यांची संख्या सुमारे 26 कोटी 90 लाख होती, 2020 मध्ये ती वाढून सुमारे 36 कोटी 50 लाख झाली. असा अंदाज आहे की 2022 मध्ये, 55 कोटींहून अधिक म्हणजे जवळपास निम्मी लोकसंख्या ऑनलाइन गेम खेळण्यात व्यस्त होती. 2016 मध्ये, भारतातील ऑनलाइन गेम मार्केट सुमारे 4,000 कोटी रुपये होते, जे आता 7,000 ते 10,000 कोटी रुपयांवर पोहोचले आहे. दरवर्षी त्यात १८ टक्के वाढ होत आहे. पुढील वर्षी ते 29 हजार कोटींच्या आसपास पोहोचेल, असा अंदाज आहे. गेमचे सुमारे शेहेचाळीस टक्के खेळाडू जिंकण्यासाठी किंवा त्याच्या प्रगत टप्प्यापर्यंत (एडवांस्ड स्टेज') पोहोचण्यासाठी पैसे खर्च करण्यास तयार असतात.अनेक ऑनलाइन गेममध्ये पैसे कमावण्याचा पर्यायही असतो, त्यामुळे मोठ्या संख्येने तरुणांनी पूर्णवेळ नोकरी म्हणून त्याचा स्वीकार केला आहे. करमणूक आणि छंदासाठी खेळला जाणारा खेळ आता जुगार आणि सट्टेबाजीत बदलत आहे. भारतीय आता दररोज सरासरी २१८ मिनिटे ऑनलाइन गेम खेळत आहेत. यापूर्वी ही सरासरी १५१ मिनिटे होती.

हे व्यसन लहान मुलांना तसेच वडीलधाऱ्यांना अत्यावश्यक काम करण्यापासून परावृत्त करते. गेल्या वर्षी भारतात झालेल्या एका सर्वेक्षणात, वीस वर्षांखालील 65 टक्के मुलांनी कबूल केले की ते यासाठी अन्न आणि झोप सोडण्यास तयार आहेत आणि अनेक मुले ऑनलाइन गेम खेळण्यासाठी त्यांच्या पालकांचे पैसे देखील चोरी करण्यास तयार आहेत. 'गेमिंग ॲडिक्शन'ची ही समस्या केवळ भारतातच नाही तर संपूर्ण जगात आहे. गेल्या वर्षी ब्रिटेन (यूके) च्या सर्वेक्षणात असे आढळून आले की सहापैकी एका मुलाने कबूल केले की त्यांनी गेम खेळण्यासाठी त्यांच्या पालकांचे पैसे चोरले आहेत.यासाठी बहुतांश मुलांनी त्यांच्या पालकांचे डेबिट किंवा क्रेडिट कार्ड त्यांना न सांगता वापरले. काही ऑनलाइन गेम विनामूल्य आहेत, काहींना पैसे द्यावे लागतात. अनेक खेळ जिंकण्यासाठी 'बक्षीस' देखील आहे, ज्यामुळे लोभ वाढतो. हरल्यावर, हरलेले पैसे परत मिळावेत असं त्यांचं मत पडतं. त्यामुळे ते या खेळातच अडकून पडतात. साहजिकच सतत खोटे बोलणे, कर्ज घेणे या सवयींना मुले बळी पडतात. ऑनलाइन गेम्स जास्त खेळल्याने मुलांच्या मनावर आणि मेंदूवर खूप वाईट परिणाम होतो. ते चिडखोर आणि हिंसक होत आहेत. आई-वडील आणि नातेवाईकांशी बोलण्याऐवजी ते या आभासी दुनियेत हरवून जाणे पसंत करतात. न्यू मेक्सिको युनिव्हर्सिटीच्या संशोधनानुसार, जगभरातील 15 टक्के गेम खेळलयाने लोक व्यसनाधीन झाल्यानंतर मानसिक आजारी पडतात. या आजाराची काही लक्षणे आहेत, जी वेळीच ओळखणे अत्यंत आवश्यक आहे. उदाहरणार्थ, खेळांव्यतिरिक्त इतर सर्व गोष्टींमधून माघार घेणे, भूक न लागणे, डोळे आणि मनगटात दुखणे, डोकेदुखी, झोप न लागणे, खेळता न आल्याने चिडचिड होणे इ. याशिवाय चिडचिड, विस्मरण, नैराश्य, तणाव, अवसाद यासारखे आजारही जन्म घेऊ लागतात. 70% ऑनलाइन गेममध्ये, 'लूट बॉक्स'सारखे स्टॉप मुलांना खूप आकर्षित करतात.हे 'लूट बॉक्स' पैसे देऊन विकत घेता येतात आणि उघडल्यावर खेळात पुढे जाणे सोपे जाते. ब्रिटनमध्ये, 19 वर्षाखालील 11 टक्के मुलांनी या 'लूट बॉक्स' विकत घेण्यासाठी त्यांच्या पालकांचे 1,130 कोटी रुपये चोरले. 2018 मध्ये जगभरातील गेमर्सनी 'लूट बॉक्स' खरेदी करण्यासाठी 2 लाख 25 हजार कोटी रुपये खर्च केले होते. असा अंदाज आहे की 2025 पर्यंत 'गेमर्स' 'लूट बॉक्स'



खरेदीवर 3 लाख 75 हजार कोटी रुपये खर्च करतील. ही रक्कम भारताच्या आरोग्य आणि शिक्षण बजेटपेक्षा जास्त आहे. अनेकदा अशा बातम्या ऐकायला मिळतात की मुलं पुढची पातळी गाठण्यासाठी जीवही गमावतात.

व्हर्च्युअल जग हेच मुलांचे जग बनत असेल तर ही अत्यंत चिंतेची बाब असून पालकांनीही याचे भान ठेवायला हवे. पालकांनी आपल्या मुलांना चांगल्या कामात गुंतवून ठेवावे, त्यांच्याशी खेळावे, त्यांच्याशी बोलावे, त्यांच्या आयुष्यातील रंजक अनुभव कथन करावे, त्यांना चांगली आणि अभ्यासपूर्ण पुस्तके वाचण्यास प्रोत्साहित करावे, सर्जनशील कार्य करण्यास प्रोत्साहित करावे, छोट्या-मोठ्या कामात त्यांची मदत घ्यावी.यामुळे मुले आभासी जगातून बाहेर पडतील आणि त्यांना खऱ्या जगात खूप काही शिकायला मिळेल. अलीकडेच, चीन सरकारने काही कठोर नियम केले आहेत, ज्यानुसार 18 वर्षाखालील मुले आठवड्यातून तीन तासांपेक्षा जास्त ऑनलाइन गेम खेळू शकणार नाहीत. तेथे 18 वर्षांपर्यंतची मुले शुक्रवार, शनिवार आणि रविवारी प्रत्येकी एक तास ऑनलाइन गेम खेळू शकतात आणि तेही फक्त रात्री 8 ते 9 या वेळेत. मुलांना हे नियम पाळायला लावणे आणि ऑनलाइन गेम खेळणाऱ्या मुलांची ओळख स्वतः पटवणे ही गेमिंग कंपन्यांची जबाबदारी असेल.असे नियम भारतातही बनवले जावेत आणि ऑनलाइन गेम खेळण्यावर नियंत्रण आणले जावे, हे अत्यंत आवश्यक आहे. या ऑनलाईन गेमवर 28 टक्के कर लावून शासनाने एक पाऊल पुढे टाकले आहे. आता जगभरातील मुख्य खेळांमध्ये ऑनलाइन गेमचाही समावेश होत आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेत 'ई-स्पोर्ट्स'चे कार्यक्रम होणार आहेत. ऑलिम्पिक समितीनेही त्याला मान्यता दिली आहे. त्यामुळे या उद्योगावर पूर्णपणे बंदी घालता येणार नाही, पण लोकांना जुगाराचे व्यसन लावणाऱ्या ऑनलाइन गेम्सवर नियंत्रण ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. ज्या तरुणांना कुटुंब, देश आणि समाज पुढे नेण्यासाठी कष्ट करावे लागतात, त्यांचा वेळ ऑनलाइन गेम खेळून वाया जात आहे. कोविडच्या काळात शाळा-महाविद्यालये बंद असल्याने ऑनलाइन अभ्यासाचा कल वाढला आहे, त्यामुळे आता प्रत्येक मुलाच्या हातात संगणक, लॅपटॉप किंवा मोबाइल आहे. परंतु अभ्यासापेक्षा ते त्यांचा वापर ऑनलाइन गेम खेळण्यासाठी करतात, जे खूप धोकादायक होत आहे. त्यावर नियंत्रण ठेवणे अत्यंत गरजेचे आहे.

# समुद्रातील नौकेप्रमाणे जीवन असले पाहिजे



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**संसारात राहून मन निर्विकार ठेवणं तितकंस सहज सोपं नाही हे वास्तव आहे पण अशक्य नाही. म्हणून प्रयत्न केला तर मन निर्विकार ठेवता येत. ज्याप्रमाणे नौका पाण्यात असुन पाण्यापासुन अलिप्त असते अथवा अथांग समुद्राचे पाणी नौकेत प्रवेश करत नाही त्या सारखंच मानवी जीवन देखील असलं पाहिजे. आपण संसारात असताना देखिल स्वतःला संसारापासुन अलिप्त ठेवता आलं पाहिजे. संसारात अलिप्त असणं म्हणजे मोह,माया ,भौतिकता या सोबतच कोणत्याही बाबी विषयी आपल्या मनात आस नसली पाहिजे. अथवा असक्ति निर्माण नाही झाली पाहिजे. अगदी साक्षी भाव ठेवून संसारात वावरता आलं पाहिजे. ज्या पद्धतीने समुद्रात आपल्या धेय्य मार्गावर प्रवास करताना नौका डगमगत नाही. पैलतीर पोहचण्यासाठी अनेक वादळांशी झुंज देते पण माघारी फिरत नाही.**

अथवा आपली दिशा बदलत नाही पैलतीरावर जाणं हाच अंतिम निश्चय असतो. हा निश्चय पुर्ण होत असताना अनेकदा संघर्ष देखिल वाटायला येत असतो.याच संघर्षाला न घाबरता अनेक वादळांवर संकटंवर अडचणीवर मात करत ज्या प्रमाणे नौका कोणत्याही परिस्थितीत पैलतीरावर पोहचतेच त्या प्रमाणे अगणित संकटांवर मात करत आपल्याला सुद्धा आपल्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत यशस्वी पणे पोहचता आलं पाहिजे. मन बुद्धी हि शरीर रूपी नौकेचे नावाडी असल्याने अनेक वेळा वादळानुसार भ्रम निर्माण होणं स्वाभाविक आहे. पण अट्टल निश्चय पैलतीर हाच असला पाहिजे.पाण्यामध्ये असणारी नौका ज्या प्रमाणे पाण्यात असुन सुद्धा नौकेत पाणी प्रवेश करू शकत नाही. आणि नौका आपला जो नियोजित प्रवास आहे तो अनेक वादळांना तोंड देत योग्य पद्धतीने कुठल्याही संकटा शिवाय पुर्ण करते . त्याच प्रमाणे आपण सुद्धा मानवी जीवन जगत असताना व या माया रूपी संसारात वावरत असताना मोह मायेच स्वार्थाच, लोभाच वादळ आपल्या आजूबाजूला घोंगावत असतं पण आपण त्याला बळी न पडता संसारातील अनेक बाबींपासुन स्वतःला सुरक्षित ठेवल पाहिजे. आपल्या आजूबाजूला असणार भौतिक मायारूपी पाणी हे आपल्या संसार रूपी नौकेत मध्ये प्रवेश करू शकले नाही पाहिजे. तसेच बाह्य वातावरणाचा तसेच भौतिक जगाला आपल्या मध्ये प्रवेश करू दिला नाही पाहिजे. म्हणजे आपलं जीवन हे नौके प्रमाणे असावं आपण पाण्यांत चालणारी नौका पाहिली तर एक बाब प्रकर्षाने जाणवते नौकेचा थोडासाच पृष्ठभाग पाण्यात असतो . आणि वरच्या बाजुचा बहुतांश भाग हा पाण्यावर तरंगतो म्हणजे नेमके काय तर पाण्यावर समतोल साधण्यासाठी जे काही कला कौशल्य अथवा कालागुण आवश्यक आहेत. ते काला गुण नौकेने ने आवगत केले आहेत . जेव्हा पाण्यावर तरंगत प्रवाहाच्या दिशेने नौका हळूहळू मार्गस्थ होते आणि आपल्या नियोजित मुक्कामाचे असणारे शेवटचे ठिकाण गाठते . त्याच प्रमाणे मानवाने सुद्धा आपली जीवन रुपी नौका हि अशाच पद्धतीने मायारूपी पाण्यात तरंगायला हवी . जेणेकरून आपण मायारूपी जगात जीवन जगत असताना विविध साधनांचा वापर हा आपल्या विकासासाठी करून घेतला पाहिजे. परंतु हा वापर



करून घेत असताना आपल्याला निरपेक्ष भावनेने पुढे जाता आलं पाहिजे आणि आपल्या ध्येयापर्यंत पोहोचता आलं पाहिजे. याच प्रवासा दरम्यान पोहोचत असताना या संसारिक माया व भौतिक गोष्टींना आपल्यामध्ये प्रवेश करू द्यायचा नाही.हेच महत्वाचे आहे जसं पाण्यात चालणारी नाव ही आपल्यामध्ये समुद्रातील अथांग पाणी शिरू देत नाही. त्याच प्रमाणे संसाराच्या पैलतीरावर जात असताना मायारूपी शक्ती चा प्रवेश आपल्या मध्ये झाला नाहीच पाहिजे .पाण्यात चालणार्या नौकेत जर पाणी शिरले तर ती बुडण्याची दाट शक्यता असते नव्हे ती बुडणारच हे त्रिकाल सत्य असतं .त्याच प्रमाणे संसार रुपी जीवनामध्ये जगत असताना त्या मध्ये मोहमाया सिरली तर संसार रुपी नौका हि देखिल नक्कीच बुडल्याशिवाय राहत नाही .आणि त्यामुळे जीवनातील मुक्तीचा प्रवास हा त्याच ठिकाणी थांबतो. हा प्रवास थांबवायचं नसेल आणि आपल्याला योग्य ठिकाणी पोहोचायचं असेल तर जीवन हे पाण्यात चालणाऱ्या नौके प्रमाणे असलं पाहिजे आणि नियोजित ठिकाणी ज्याप्रमाणे नौका पोहचते त्याच प्रमाणे आपल्याला आपल्या जीवनातील सर्व जबाबदारी कर्तव्य पुर्ण करुन पार पाडुन योग्य ठिकाणी पोहचता आलं पाहिजे आणि आपल्या जीवनातील मुख्य धेय्य हे देखील आपल्याला साध्य करता आलं पाहिजे. त्यासाठी आपल जीवन समुद्रातील नौके सारखं असलं पाहिजे. जे आपल्या अंतिम धेय्या साठी समर्पित असतं.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# भाजपा आणि महायुती लोकसभेच्या ४५, विधानसभेच्या २०० पेक्षा अधिक जागा जिंकेल

## भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा विश्वास

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** भारतीय जनता पार्टी आणि महायुती लोकसभेच्या 45 पेक्षा अधिक आणि विधानसभेच्या 200 पेक्षा अधिक जागा जिंकेल असा विश्वास भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी व्यक्त केला. भिवंडी (जि.ठाणे) येथे प्रदेश भाजपातर्फे आयोजित महाविजय 24 कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त आयोजित पत्रकार परिषदेत वनकुळे बोलत होते. प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, ठाणे शहर अध्यक्ष आ.निरंजन डावखरे यावेळी उपस्थित होते. बावनकुळे म्हणाले की, भाजपा महाराष्ट्रात क्रमांक एकचा पक्ष आहे आणि यापुढेही राहील. पार्लमेंट ते पंचायत स्तरापर्यंत आम्ही झटून काम करू. येणाऱ्या सर्व निवडणुकांमध्ये भाजपा अव्वल कामगीरी करेल. विधानसभा निवडणुकीत महायुतीमध्ये भाजपाला ज्या जागा मिळतील त्यापैकी 80 टक्के जागांवर म्हणजे 152 जागांवर भाजपा विजयी होईल असा विश्वास त्यांनी बोलून दाखवला. महाराष्ट्राला विकासाच्या दृष्टीने पहिल्या क्रमांकावर घेऊन जाण्यासाठी, विकासात्मक बाबी लक्षात घेऊन नियोजनबद्धरित्या भाजपा ताकदीने काम करेल अशी ग्वाही त्यांनी दिली. आगामी निवडणुकांसाठी भाजपाची यंत्रणा युद्धस्तरावर कामाला लागली असून कामांचा आढावा घेण्यासाठी २८८ वॉररुम्स तयार आहेत प्रदेश भाजपातर्फे आयोजित 'महाविजय 2024' कार्यशाळेचे उदघाट्न प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रीय सरचिटणीस आणि राज्याचे प्रभारी सी.टी.रवी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. केंद्रीय लघु, मध्यम व सूक्ष्म उद्योग मंत्री नारायण राणे, रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, मंत्री गिरीश महाजन, सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, मुंबई अध्यक्ष आ. आशीष शेलार, ठाणे ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ. किसन कथोरे आदी यावेळी उपस्थित होते. केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी प्रास्ताविक केले.

## दैनिक आधुनिक केसरीचे वाचक लिहितात



सुलेखा जक्कल
संपर्क क्र. ९२७००६४७२९

आधुनिक केसरीच्या संपादक आणि तत्पर टीमसाठी हार्दिक शुभेच्छा! कोणतेही काम सावधपणे ..जबाबदारीने करणारी पत्रकारांची टीम.. वैविध्यपूर्ण लेख, आकर्षक मांडणी, ताज्या घडामोडींची रास्त माहिती देणाऱ्या बातम्या, आध्यात्मिक, प्रबोधनपर, जनमानसावर चांगले संस्कार घडवण्यासाठी विविध पैलूंना स्पर्श करणारे परिपूर्ण लेख असा सर्वंकष वाचनीय अंक आबाल वृद्ध आणि समाजातील विविध स्तरांवरच्या वाचकांना प्रिय झाला आहे. कला, विज्ञान, ज्ञान, आरोग्य बाबत लेखांनी, काव्य,लेखन, समीक्षण तसेच साहित्यातील जुन्या नवीन सृजनाची दखल घेणारे.. वाचकाची अभिरुची वाढविणारे आहे. वृत्तपत्र म्हणुन या दैनिकाची रोजच्या सकाळी वाचक आतुरतेने प्रतिक्षा करताना दिसतात. त्यांचे समाधानासाठी जागरुक असणारी टीम, पत्रकार आणि व्यासंगी प्रतिभाशाली दृष्टा संपादक यांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि आभार!




## बक्षी कमिटीच्या अहवालाची जेएनपीटीमध्ये होळी



आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** जेएनपीटी येथे देशातील प्रमुख बंदर कामगार वेतन करार समितीमध्ये बक्षी कमिटीने सादर केलेल्या अहवालाची होळी करून निषेध व्यक्त केला गेला. वेतन करार समितीचे सदस्य आणि भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री सुरेश पाटील, जेएनपीटीचे कामगार ट्रस्टी रवी पाटील यांच्या नेतृत्वा खाली हे आंदोलन केले गेले . बक्षी समितीच्या या अहवालात कामगार विरोधी अनेक जाचक अटी असून कामगारांना लागू असलेल्या पूर्वीच्या फॅसिलिटी कमी करण्याचा डाव आहे.अशा या कामगारांच्या हिता विरोधी असणाऱ्या बक्षी कमिटीच्या विरोधात कामगारांनी मोठ्या प्रमाणात रोष व्यक्त करून या विरोधात घोषणा देऊन आपला विरोध दर्शविला. या कामगार विरोधी बक्षी कमिटीच्या अहवालाला देशपातळीवर प्रखर विरोध करण्याचे नियोजन भारतीय मजदूर महासंघाच्या वतीने विशाखापट्टणम येथे 11 जुलै रोजीच्या बैठकीत करण्यात आले होते.





## अकोल्यात 19 वर्षीय मुलाचे केले धर्मांतर

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** एका मुलाचे धर्मांतर केल्याचा प्रकार उजेडात आला असून चान्नी पोलिस ठाण्यात बुधवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी चार आरोपींना अटक केली आहे. 'तुमचा मुलगा मुस्लिम धर्मात आला असून तुम्हीही मुस्लिम धर्मात या' असे आरोपी फिर्यादीला म्हणाल्याचे 'एफआयआर'मध्ये नमूद आहे. मुलाकडे मुस्लिम धर्म स्वीकारल्याचे दस्तऐवज आढळल्याने खळबळ उडाली आहे. आलेगाव येथील या कुटुंबात पती-पत्नी, दोन मुले, एक मुलगी असून मोठा मुलगा सुनील ( नाव बदलले आहे ) हा १९ वर्षांचा असून तो अल्ताफ गादीवाले, अन्सार गादीवाले यांच्या संपर्कात आला होता. त्यांनी त्याला हैदराबाद येथे कामाला नेतो, असे सांगून बुलडाणा जिल्ह्यातील उंद्री येथील मदरशामध्ये ठेवले. मात्र, अनेक दिवस मुलाचा फोन न आल्याने त्याच्या आई-वडिलांनी अल्ताफ, अन्सार व संबंधिताकडे विचारणा केली. मात्र त्यांनी उडावा-उडवीची उत्तरे दिली. त्यानंतर ते मुलाच्या शोधासाठी हैदराबाद येथे गेले. सिकंदराबाद येथून मुलाशी फोनवर संपर्क साधला. मात्र त्याने तुम्ही घरी परत जा, असे सांगितले. त्या वेळी दुसऱ्याच एकाने फोन उचलून फोनवर आम्ही या मुलाला ओळखत नसून येथे त्याला मोहंमद अली असे म्हणत असल्याचे सांगितले.

महाराष्ट्र Business Katta









# राजकारणातली निष्ठा, नीतिमूल्ये, हिंदुत्व, पुरोगामीत्व वगैरे या सगळ्यांचं काय झालं ?

## || मंथनाचे पैलू ||




डॉ. धोंडोपंत मानवतकर
संपर्क क्र. 9890827414

लेखांक : २४

*स्वार्थधर्मी*
*समाजधुरीणांच्या*
*कळपांना*
*खुर्ची, पद मिळालं की,*
*परिवर्तनावर बोलणाऱ्यांच्या*
*तोंडाला कुलुप...*
*समतावादी गप्पांची*
*गळचेपी....*
*चोरांनी कुत्र्याला*
*हाडूक फेकावं*
*अन्*
*गुमान चोरी करावी*
*अशीच झालीय*
*वादी-प्रतिवादींच्या*
*विचार प्रवाहाची परिणती*
*त्यागाच्या सीमारेषा*
*खुर्चीच्या भोगापर्यंतच*
*येऊन थांबतात वाटतं*
*हे कोडंही मला*
*आज उलगडलं. !*
*दादा म्हणाला, नाही रे बाबू....*
*नीती, धर्म, अब्रू हे*
*सत्तेच्या पायथ्याशीच*
*गोंडा घोळतात,*
*पार ऽऽ पुरातन काळापासून !*

'नीती, धर्म, अब्रू' ही कविता २०११ साली प्रकाशित झालेल्या माझ्या 'रुपांतर' या कवितासंग्रहातील पान ७ वर आहे.. हा विचार मी १३ वर्षापूर्वी मांडलेला आहे...हा विचार आज सुरु असलेल्या राजकारणाशी काहीसा मिळताजुळता वाटू लागतोय. आजच्या राजकारणाचा गढूळ प्रवास माझ्या काव्यात १३ वर्षापूर्वीच नोंदवलेला आहे...

भारतीय राजकारणाची विद्यमान स्थिती अत्यंत भयावह आहे. राजकारणात निर्माण केलेल्या गढूळपणाला जनता त्रासून गेलेली आहे. सध्या भारतीय राजकारणाकडून कोणती नीतिमूल्ये शिकावीत...असा प्रश्न नवोदित राजकारणी युवकांसमोर आहे. भारतात सध्या जी राजकारणाची अत्यंत भयावह स्थिती आहे, ती कोणत्याच देशात नसेल असे मला वाटते. राजकारणातून निष्ठा, नीतिमूल्ये, आचारसंहिता, विचारधारा या गोष्टी आज हद्दपार झाल्या आहेत. त्या का झाल्या आहेत ? यावर सविस्तर चिंतन व्हायला पाहिजे. त्यासाठी लोकांनी अशा नीतीभ्रष्ट राजकारण्यांचा निषेध तर केलाच पाहिजे शिवाय अनेक संघटनांनी पक्षांनी रस्त्यावर उतरून ह्या भ्रष्ट शक्तीचा विरोध केला पाहिजे. कारण हे राजकारणी आता जनतेसोबतही प्रतारणा करत आहेत. ही मानसिकता बदलण्यासाठी लोकांचा पुढाकार फार महत्वाचा आहे.

भारतीय संविधानानुसार हा देश चालायला पाहिजे ; परंतु तो संविधानानुसार सध्या चालवला जात नाही. जनतेच्या स्वातंत्र्याची मुस्कटदाबी केली जात आहे. त्यांच्या विचारांना कुठेच थारा दिला जात नाही. आजचे राजकारण सत्तेच्या अभिलाषेने ग्रासलेले आहे. भ्रष्टाचाराने बरबटलेले आहे. अत्यंत खालच्या स्तराला गेलेल्या राजकारणाची नीती जनतेच्या हिताची नाही.

गढूळ राजकारणात फक्त सत्तेचे पुजारी निर्माण होत आहेत. अनेक दशके, शतके आपलीच सत्ता असावी या असुरीआकांक्षेने विरोधी पक्ष संपविण्याचा घाट घातला गेलाय. तो आजही सुरूच आहे. विरोधी पक्षाला येनकेनप्रकारे संपविण्याचे आटोकाट प्रयत्न सुरू आहेत. विरोधकांना संपवून कितीतरी वर्षे फक्त आपलीच सत्ता भारतावर असावी हा कोणत्या पक्षाचा स्वार्थी विचार लोकशाहीवादी जनता कसा रुजू देईल ? म्हणून जनता बोलत आहे, विरोध करत आहे. कारण जेवढा विरोधीपक्ष कडक, सक्षम जागरूक व तत्पर असेल तेवढा सत्ताधाऱ्यांवर अंकुश ठेवला जाऊन सामाजिक किंवा राजकीय विकृतीला आवर घालण्याचे काम विरोधीपक्ष करत असतो. उदा. एखादी मोटारसायकल वाळूतून किंवा भुसभुशीत मातीतून चालणारच नाही, चालली की,



ती फसेल; परंतु तीच मोटारसायकल डांबरी किंवा सीमेंट रोडने चालली तर खूप पळेल. फसणार नाही. म्हणून डांबर रस्ता किंवा सीमेंट रस्ता जसा एखाद्या वाहणाला सरळ चालण्याला पळण्याला कारणीभूत ठरतो तशाच प्रकारची भूमिका विरोधी पक्षाची असते. विरोधी पक्षामुळेच सत्ताधारी सरळ राहतात. मात्र भाजप हा पक्ष विरोधीपक्ष नेत्यांनाच आपल्या पक्षात ओढून घेत आहे. म्हणजे विरोध करण्याचा प्रश्नच उरत नाही.

भाजपाचे राजकारण पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्यापर्यंत राष्ट्रहिताच्या विचारधारेवर चालत होते; मात्र अलिकडे भाजपची राष्ट्रहिताची विचारधारा नष्ट झाल्याचे दिसून आले आहे. लोकशाहीच्या देशात राजकीय पक्षाने राष्ट्रहिताचीच भूमिका बाळगावी. केंद्राच्या सत्तेत असणारा भाजप मात्र राष्ट्रहिताच्या गोष्टी करत आहे आणि वाटचाल हुकुमशाहीची करत आहे. लोकशाहीत लोकांच्याच हिताचा विचार करावा लागेल..!

राजकारण हे पक्षाचा, सत्तेचा, स्वार्थाचा विचार करण्याचे क्षेत्र नाही. राजकारण, समाजकार्य, शिक्षण, धर्म ही क्षेत्रे जनतेची सेवा करण्याची क्षेत्रे आहेत. कोणताही पक्ष किंवा राजकीय माणूस हा जनतेचा खरा सेवक असतो. सेवक म्हटले की, तो हुकमी नसतो आणि त्याच्याकडे स्वार्थ नसतो. आजचा राजकारणी तर राजकीय क्षेत्राकडे व्यवसाय म्हणून पाहू लागला आहे. राजकारणाला जे लोक व्यवसाय समजत असतील ते भ्रष्टाचारच करणार.! यात शंका नाही; कारण व्यवसायात केवळ नफ्याचा किंवा फायद्याचाच विचार केला जातो. जिथे नफ्याचा व फायद्याचा विचार येतो तिथे सेवा या शब्दाला अर्थ उरत नाही.

राजकारणात उतरले की,सत्ता, संपती, मान, सन्मान, पद, प्रतिष्ठा मिळविण्याची राजकारण्यांना घाई झालेली असते. एखाद्या निवडणूकीत पन्नास लाख रुपये खर्च झाले की, पुढच्या पाच वर्षात दोन कोटी रुपये कसे काढता येतील अशी त्यांची मानसिकता ठरलेली असते. या मानसिकतेत कसा दिसेल सेवाभाव ?

राजकारण तर सेवाभाव शिकवते. आजच्या राजकारणात तुम्हाला कुठेच सेवाभाव दिसून येणार नाही. सेवाभाव ऐवजी मेवाभाव दिसून येईल.

जनता दूधखुळी नाही. जनतेला चांगले काय ? वाईट काय ? हे कळत असते आणि भारतीय जनतेला तर कळतेच कळते. जनतेची मने डायव्हर्ट केली जातात. जनतेला संभ्रमात टाकले जाते आणि काही कायदे जनतेच्या विरोधात केले जातात. जेणेकरून जनतेला गुलाम कसे करता येईल ! जनता गुलाम झाली की, मनमानी करता येते. मोठमोठे घोटाळे करता येतात... आणखी बरंच काही...वगैरे वगैरे

अलिकडे महाराष्ट्राच्या राजकारणात सत्तेसाठी जी उलथापालथ झाली. ती जनतेची मागणी नव्हती. तो सत्ताधाऱ्यांचा सत्तेसाठीचा सत्तासंघर्ष होता. या सत्तासंघर्षात संविधानमूल्यांचा विचार तर नाहीच नाही; परंतु पक्षाची आचारसंहिता, पक्षावरची निष्ठा, पक्षाची अब्रू, पक्षाची विचारधारा ह्या बाबींनाही थारा दिला गेला नाही. कारण आजच्या राजकारण्यांचा धर्म स्वार्थाचा आहे, खुर्चीचा धर्म आहे, पदाचा धर्म आहे, भ्रष्टाचाराचा धर्म आहे.. घोटाळ्यांचा धर्म आहे......मतदारांचे हित, मतदारसंघाचे हित किंवा शेतकरी वर्गाची कणवळा किंवा गरीबांबद्दलची अस्मिता किंवा विषमता नष्ट करण्यासाठीची परिवर्तनवादी विचारधारा किंवा पुरोगामीत्व वगैरे काही नाही, ये सबकुछ झूठ है !

म्हणून भारतीय राजकारणावरील जनतेचा विश्वास उडालेला आहे. मतदारांचा विश्वासघात केला गेला आहे. महाराष्ट्रातील राजकारणाने तर राजकीय नीतीमूल्यांची पायमल्लीच केली आहे. येणाऱ्या निवडणूकीत हे नीतीभ्रष्ट राजकारणी लोक कशाप्रकारे सामोरे जातील आणि जनतेचा कसा कौल घेतील ? याचा विचार आजच करण्यापेक्षा येणाऱ्या निवडणूकीचीच वाट पाहुया..!

# है दुनिया उसी की....



प्रा.डॉ.प्रतिभा अहिरे
संपर्क क्र.: 9284196304

आधुनिक केसरी

**सईसांज दाटून आलेली. सूर्य परतीला निघालेला . व्हॅनगॉखची प्रिय सूर्यफूल हताशपणे माना टाकू लागलेली असताना.. तु सोबत नसल्याची जाणीव अधिक च गडद होत जाताना दुरून सॅक्सोफोनची धून वाऱ्यावर लहरत तरंगत येते अन् कोलमडलेलं काळीज अधिकच क्रूरपणे कापत जाते.. "है सजदे के काबील हर वो दिवाना के जो बन गया हो तस्वीरे जाना.... अन् आपापली दुःख,आपापली वेदना, आपापलं एकटेपणं ठळक होतं ..उभं राहतं आपल्या एकोल अस्तित्वाच्यापुढ्यात वाकुल्या दाखवत.हे सामर्थ्य असतं त्या रचना,गीत ,संगीत अन् त्या वाद्यांचे.हिंदी चित्रपट सृष्टीत भावना व्यक्त करण्यासाठी गीत, संगीताचा माध्यम म्हणून वापर केला जातो. दृश्यानुरूप चाल ,गीत, संगीत, गायकाचे आवाज यांची हार्मनी साधून सृजनात्मक रचना रसिकांसमोर पेश केल्या जातात प्रसंगानुरूप वाद्य, आर्केस्ट्रा निवडला जातो.**

काही वाद्य मर्यादित प्रमाणात भावना व्यक्तविण्यासाठी टेकू दिल्यागत वापरली जातात. मात्र सॅक्सोफोन हे वाद्य नाना तऱ्हेच्या भावना व्यक्त करते.ह्या वाद्याचा आकार मोठा व वाद्य महागडं आहे पण ह्या विशाल वाद्याची सुरावट त्याच्या तोंडाशी असलेली इवलीशी ' रीड' नावाची पेनाच्या निबसारखी लाकडी पट्टी किंवा वुडविंड यावर अवलंबून असते.ह्या वाद्यातून आनंदी, दुःखी, रोमॅन्टिक असे विविध मूड व्यक्त करता येतात.

एस.डी.बर्मन, आर.डी. बर्मन,सलीलचौधरी,कल्याणजीआनंदजी, ओ.पी. नय्यर यांनी अशा असंख्य अवीट सुरावटी रसिकांसाठी रचल्या आहेत. ज्यात एक आर्तता आहे..विरह आहे.. हुरहुर आहे...सॅक्सोफोनचे सूर उदासी गहिरी करतात. संध्याकाळ अधिक कातर बनवतात. तरी हवेहवेसे वाटतात. कधीकधी संध्याकाळ मला अगम्यपणे उदास उदास करते. उगाच नॉस्ट्लजिक करते.आपलं अन् जगाचं नेहमीच miscommunication.. आपलं म्हणणं नीटपणे मांडता न येण्याचं शल्य टवके काढत राहतं दुखऱ्या काळजाच्या.आपण कैक शतकांपासून वाट पाहत बसतो की यावेळेस तरी आपलं म्हणणं नीटपणे मांडायचं..पण नेमक्यावेळी दुसरंच काहीतरी निरर्थक बोलून जातो आपण.भीती दाटून राहते सतत ते ऐकून घेतलं जाईल की नाही याची.

की बंद केले जातील दरवाजे...की ढकललं जाईल दाराबाहेर .. ? की लावलं जाईल ओठांवर पुन्हा कुलूप संस्कृती,परंपरा,नीतीनियमांचं... ?आपण पुन्हा समंजसपणाच्या चिलखताखाली दडपून मारले जाऊ का,पुन्हा गुदमरेल का जीव ? असं खूप काही..बारीक सारीक वेदना चरत राहतात काळजात.आठवणी दाटून येतात हताशपणे बोट सोडून निघून गेलेल्या जिवलगांच्या..अशावेळी गाणी मैत्र निभावतात.

काही गाणी खूपच प्रिय असतात. पुन्हा पुन्हा ऐकली तरी नकोशी वाटत नाहीत. काही तुझी लाडकी असल्यानं,काही तुझ्याकडून ऐकल्यानं प्रिय झालेली.. काही तुझ्याशी संबंधित असल्यानं.. काही तु नसताना ऐकल्यानं असं बरंच काही. मी ऐकत राहते पुन्हा पुन्हा. गाता रहे मेरा दिल, तुम्ही याद होगा कभी हम मिले थे,मेरे दिल ने जो चाहा मिल गया, बेदर्दी बालमा, वो भूली दोस्ता. जनम जनम का साथ है निभाने को, मेरा प्यार भी तू है,तेरे मेरे सपने अब एक रंग है, आजकाल तेरे प्यार के चर्चा हर जुबॉन पर..

एका सायंकाळी दादांचे मित्र माटे काका घरी आले त्यांच्या हातात एक पेटी होती.त्यात काय आहे विचारलं तर सॅक्सोफोन..त्यांनीच ही " रीडची महती सांगीतली. अन् त्यांनी गाणं वाजवलं


**"ये मेरा दिवानापन है..**
**या मुहब्बत का सुरूर**
**तू न पहचाने तो ये है**
**तेरी नजरो का कसूर.."**

अन् मी तर कायल झाले या वाद्याची.मग एकदा इकबाल दरबार यांच्याकडून प्रत्यक्ष ऐकायला मिळालं

**"है दुनिया उसी की**
**जमाना उसी का..**
**मुहब्बत मे जो हो गया हो**
**किसी का...."**

आज तुला ऐकवलं तर तु म्हणालास मला पाठव म्हणून ही आठव. गाणं बारमधे .पडद्यावर गातोय शम्मीकपूर ,स्वर महम्मद रफींचे अन् पाठराखण करतेय सॅक्सोफोनची अवीट सुरावट.चित्रपट काश्मीर की कली,संगीत ओ.पण.नय्यर यांचं आहे.

**"लुटा जो मुसाफिर दिल के सफर मे**
**है जन्नत ये दुनिया उसकी नजर मे**
**उसी ने है लूटा मजा जिंदगी का....**
**है सजदे के काबील हर वो दिवाना**
**के जो बन गया हो तस्वीरे ..जाना**



**करो एहतराम उसकी दिवानगी का .....**
**बरबाद होना जितकी अदा हो**
**दर्दे मुहब्बत जिसकी सजा हो**
**सतायेगा क्या गम उसे जिंदगी का ?**
**मुहब्बत मे जो हो गया हो किसी का....**

विरहात व्याकुळ शम्मी स्टाईलमधे झोकांड्या खातोय, पोलला गिरकी घेऊन त्याच्या झुपकेदार जुल्फेंना झटका देतो.. सॅक्सोफोन वादक त्याच्याभोवती गिरक्या घेत त्याच्या वेदनेला साथसंगत करतो.. दारापर्यंत जातो निरोप द्यायला जिवलगासारखा.. त्याच लयीत ती आर्त सुरावट आपलं काळीज पिळवटत राहते.. पाठवतेय.. ऐकू येतंय नं...

# दुबार पेरणी...



माधव अरुण डाके
संपर्क 9730115620

आधुनिक केसरी

**आपल्या घराच्या उंबऱ्यावर डोक्याला हात लावून बसलेला हनुमान आज प्रचंड उदास झालेला दिसत होता. त्याच्या डोक्यावरचे विस्कटलेले काळे- पांढरे मिश्र केस, अंगावरचे लहान लहान छिद्र असलेले मळकट पांढरे बनियान, आणि पिवळसर पांढऱ्या रंगाची गुडघ्यपर्यंत गोळा झालेली ट्राऊजर पॅन्ट, परिधान केलेला हनुमान आज प्रचंड ताणतणावात दिसत होता. मारुती मंदिराच्या पारासमोरील हापश्यावरून पाण्याची घागर डोक्यावरून घेऊन येणाऱ्या सुमनने दुरूनच आपल्या नवऱ्याचा अवतार पाहिला. त्याचे विस्कटलेले केस अन अंगावरचे मळकट बनियान व गोळा झालेली ट्राउझर पॅन्ट, हा अवतार पाहून ती मनातच पुटपुटली, "काय करावं बाई या माणसाचं; अंग भरून कधी चांगले कपडे घालतच नाही. कितीदा मी सांगितलं की, बीडावरून तुम्हाला चांगला नेहरू आणि पायजमा घेऊन या म्हणून, पण काय करावं ऐकायचंच नाही कुणाचं.**

सुमन स्वतःशी पुटपुटतच घराजवळ आली.हनुमान आणि सुमन च लग्न होऊन आता जवळपास पंधरा वर्षे होऊन गेली होती. त्यांच्या संसार वेलीला 'अर्जुन ' आणि ' मीना ' अशी गोड फळेही लागली होती. अर्जुन थोरला होता.आणि मीना धाकटी. गावातल्या जिल्हा परिषदेच्या शाळेत अर्जुन आठवीच्या वर्गात शिकत होता. तर मीना पाचवी च्या वर्गात शिकत होती. दोन्ही मुलं अभ्यासात प्रचंड हुशार होती. हनुमान ची आर्थिक परिस्थिती जेमतेमच होती. त्याला पाच सहा एकर कोरडवाहू जमीन होती.शेतात विहीर नसल्याने बागायती जमिनीचा विषयच नव्हता. पावसावर अवलंबून असणारी शेती तो करत असल्याने, दरवर्षी बिनभरवाशाच्या पावसावर त्याला अवलंबून राहावे लागत असे.

यावर्षी उशिरा पाऊस झाल्याने पंचवीस जून च्या पुढेच पेरण्या झाल्या. गावातल्या खाजगी सावकाराकडून कर्ज घेऊन यावर्षीची पेरणी त्याने कशीबशी उरकली. रानात थोडीफार ओल असल्याने व गावातल्या जवळपास सर्वांच्याच पेरण्या उरकल्याने आपणही मागे राहता कामा नये, म्हणून हनुमान ने ऐपत नसतानाही दहा रुपये शेकड्याने गावातीलच नामदेव नावाच्या खाजगी सावकाराकडून व्याजाने पैसे घेऊन, बियाणं खरेदी केलं;आणि शेतात पेरलं. कापूस,सोयाबीन, बाजरी, मुग या पिकांची त्यानं आपल्या शेतात लागवड केली अन् पावसाची वाट बघू लागला.

आज आठवडा संपला तरी पावसाचा थेंब आला नाही. गावाकडे पावसाने पाठ फिरवली.सगळं गाव पावसाची चातका प्रमाणे वाट पाहु लागले. रानात पेरलेलं उगवलंच नाही. गावातल्या सगळ्या शेतकऱ्यांची चेहरे काळे ठीक्कर पडले. भरल्या गावात उदासी नांदू लागली. जो तो वर आभाळाकडे पाहत एकमेकांना विचारत होता... ' पाऊस कधी येईल हो...' आणि सोमोरचा व्यक्ती ' येईल..येईल..आल्या शिवाय राहील का '. असं बोलून एकमेकांना जणू मानसिक आधारच देत होते.

रानवारा जोरात सुटला होता. त्याचा भरभर करणारा आवाज लोकांचं काळीच चिरत होता.दिवसात थोडेफार काळे ढग येत असत. हा भरभर वाहणारा वारा ते काळे ढग पांगवत होता. सारे गाव हैराण झाले होते.ज्याच्या त्याच्या तोंडचे पाणी पळाले होते. चिंतेने गावकरी ग्रासले होते.

सुमन घराजवळ येताच हनुमानचा चिंताग्रस्त चेहरा तिने अचूक हेरला. आणखी जवळ जाऊन सुमनने त्याला न्याहाळले. डोक्यावरची घागर तिने तिथेच उंबऱ्याच्या बाहेर बाजूला ठेवली. डोक्यावरची चुंबळ डाव्या हातात घेऊन, ती मोठ्या करुण अंतकरणाने आपल्या पतीशी बोलू लागली," का हो मालक, आज असं उदास उदास उंबऱ्यावर बसलाय; काही अडचण आहे का ? काही दुखते खुपते का तुमचे ?काय झालंय सांगा मला ?"

हनुमान ने सुमन कडे पाहिले.त्याचे डोळे पाणावले होते. चेहरा रडवेला झाला होता. दाढीवरचे पांढरे व जाड खुटं त्याच्या चेहऱ्यावरच्या उदासीनतेत आणखीच भर घालत होते. पत्नी सुमन ने त्याच्या हाताला धरून त्याला समजावण्याच्या स्वरात ती म्हणाली, "मालक तुम्ही असं दुःख उरात दाबून धरलं,तर मला समजायचं कसं ?मोकळ व्हा... मला सांगा काय अडचण आहे ते "

असं म्हणून हनुमानला सुमन घरात घेऊन जायला निघाली.. बाहेर रस्त्यावरून येणारे जाणारे लोक आपल्याकडे पाहू नयेत म्हणून हनुमान तिच्याबरोबर गप गुमान घरात गेला. हनुमान चे घर म्हणजे पत्र्याचे शेड. मागच्या दोन अडीच वर्षांपूर्वी आपल्या दोन्ही भावंडापासून वेगळे राहिल्यानंतर हनुमान ने गाव खोरीतल्या शेत वस्तीवरच पत्र्याचे शेड बांधून आपला संसार थाटला होता. पुढे मागे एखादं पीक चांगलं झालं की, भरपूर पैसा येईल आणि मग आपण चांगलं पक्क घर बांधू असा त्याचा मनोदय होता. पण दरवर्षी शेतातील पीकं हनुमानाला धोकाच देत होती.

मागच्या वर्षी सोयाबीन जोमात आले होते. काढणीला



आलेलं सोयाबीन त्याच्या डोळ्यादेखत पाण्या त पोहत होतं. पंधरा दिवस सतत पावसाची झड लागून राहिली आणि त्याच्या शेतातलं सोयाबीन अक्षरशः पाण्यात सडून गेलं होतं. कापसाच्या तर वातीच झाल्या होत्या. बोंडे झाडावरच सडली होती. आणि दोन्ही पिके पाहता पाहता हातची निघून गेली होती. यावर्षी लागवडीसाठी हनुमान ने मोठा खर्च केला होता. खिशात पैसे नसतानाही सावकाराकडून कर्ज घेतलं अन् पेरणी केली होती. आज आठवडा गेला तरी पाऊस आला नाही.हनुमानाच्या संपूर्ण गावावरच जणू पाऊस रुसला होता.

हनुमान ला खाटेवर बसवून सुमनने पाण्याने भरलेला तांब्या हनुमानच्या हातवर टेकवला. हनुमानने तो पाण्याने काठोकाठ भरलेला तांब्या एका दमात संपवला. अन् एक मोठा श्वास घेऊन तो आपल्या पत्नीला बोलू लागला,

" यावर्षी एकतर पाऊस उशिरा झाला. पेरणीसाठी बियाणे खरेदीला सुद्धा माझ्याकडे पैसा नव्हता. मागचं डोंगरा एवढं कर्ज असतानाही पेरणी अन् लेकरांची वह्या,पुस्तके, शाळेच्या फिया भरण्यासाठी गावातीलच नामदेव सावकाराकडून दहा रुपये शेकड्यांनी व्याजाने पैसे घेतले आहेत. शेतात पेरणी होऊन आज हप्ता उलटलाय,तरी पाऊस नाही. त्यामुळे पेरलेलं उगवलं नाही. अजून चार दोन दिवस जर पाऊस नाही पडला तर; 'दुबार पेरणीचं ' संकट मला पुढं दिसतंय.दुबार पेरणीसाठी आता पैसा कुठून आणायचा ? मागच्या कर्जाचा डोंगर... त्यात आता दुबार पेरणीचं हे संकट..." असं म्हणून हनुमान ने आपल्या पत्नीच्या सुमनच्या गळ्यात पडून मोठ्यांना हंबरडा फोडला. सुमन त्याच्या डोक्यावरून आपल्या साडीच्या पदराने त्याच्या डोळ्यातले अश्रू पुसत होती. प्रेमाने हात फिरवून त्याला शांत करत होती.

सुमन म्हणाली, " मालक फक्त तुम्ही खंबीर राहा. दुबार पेरणीच काय, अशा असंख्य संकटाशी आपण मिळून सामना करू. मी तुमच्यासोबत खंबीर लढेन. वेळ आली तर आपण ऊस तोडणीला जाऊ. आलेल्या संकटाशी द मिळून दोन हात करू.पण तुम्ही असे खचू नका. धीर सोडू नका. शांत व्हा सगळं ठीक होईल. सुमन पतीची समजूत काढत होती. पण तिचे डोळे मात्र अश्रू गाळत होते. दोघांच्या डोळ्यातून आता अश्रूंच्या धारांचा पाऊस पडत होता;पण दुबार पेरणीचं संकट घालवणारा पाऊस मात्र पडायलाच तयार नव्हता....

# बेकार मुलांची नोकरीस्तव वणवण आणि निवृत्त बापांना निमंत्रण!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**उन्हाळी सुट्टीनंतर राज्यभरातील सर्व शाळा सुरू झाल्या आहेत. पण जिल्हा परिषद शाळेत शिकविण्यासाठी शिक्षकच नाहीत. अशा बिकट परिस्थितीचे चित्र समोर आले. त्यामुळे सेवानिवृत्त शिक्षकांची कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. शिक्षण विभागाकडून कंत्राटी भरतीसाठी अध्यादेश काढला आहे. राज्यात सुशिक्षित बेरोजगार युवकांची नोकरीच्या शोधात वणवण भटकंती सुरू असताना त्यांना तसेच झुलवत ठेवण्याचा हा घाट तर रचला जात नाही ना? अशी मनात संशयाची पाल चुकचुकते. त्यांना चिडवत वाकुल्या दाखवून जखमेवर मीठ चोळण्याचाच हा प्रकार सिद्ध होत आहे.**

महाराष्ट्रात सुशिक्षित बेरोजगार तरुणांची संख्या काही कमी नाही. नोकरीस्तव एका पदासाठी हजारो युवक आणि युवती तुटून पडत आपके नशिब अजमावताना दिसतात आहेत. कित्त्येक सरकारी विभागांत तर पैशांच्या उलाढालीच्या शर्यती लागल्याचे दृश्य बघावयास मिळत आहेत. शासनाच्या सर्वच विभागात रिक्त पदांचे डोंगरच्या डोंगर दत्त म्हणून उभे ठाकलेले आहेत. आपली लाडकी मुले उच्चशिक्षित राहूनही ती रोजी, मजुरी, नोकरीच्या शोधात शहर, गाव, रानोमाळ वणवण भटकत आहेत. कोणी मिळेल ते काम इच्छा नसतानाही करू लागले आहेत. कोणी गावातील शेळ्या, मेंढ्या, गाई, गुरे



जंगलात नेऊन चारण्यात, तर कोणी छोट्याशा चहा टपरीवर वा नामांकित होटेलात उष्टी प्लेट्स, कपबश्या विसळण्यातही धन्यता मानून घेत आहेत. हे काय कमी आहे की काय ? १०० रू. रोजीसाठी आपले शिक्षण, शैक्षणिक योग्यता, पदव्या सारे काही बासनात गुंडाळून ठेवून मुठभर अन्न व वितभर कपड्यांसाठी राब राब राबत आहेत. या भयंकर परिस्थितीची सरकारच्या वतीने कोणालाच कशी काय शरम, दया, माया येत नाही; साधे सोयरसुतक वाटत नाही. पुरोगामी म्हणून मिरविणाऱ्या महाराष्ट्रात याचेच मोठे नवल वाटतेय! शासनाकडून या सावळा गोंधळाचे परिपत्रक दि.७ जुलै २०२३ रोजी जारी करण्यात आले आहे. त्यानुसार महाराष्ट्रात सर्व जिल्हा परिषद शाळांत पुढील पंधरा दिवसांत कंत्राटी पद्धतीने शिक्षक भरती करण्यात यावी, असेही त्यात नमूद केले आहे. या शिक्षकांना मासिक २० हजार रूपये मानधन देण्यात येणार आहे. जिल्हा परिषद शाळांमध्ये मोठ्या प्रमाणात शिक्षकांची पदे रिक्त आहेत. त्यामुळेच राज्य सरकारने हा हास्यास्पद अजब निर्णय घेतला असल्याचे सांगितले जात आहे; आहे की नाही गम्मत! सेवानिवृत्त शिक्षकांच्या तात्पुरत्या नियुक्तीसाठी कमाल वयोमर्यादा ७० वर्षे ठेवली आहे. प्रत्येक जिल्ह्यासाठी प्राथमिक शिक्षणाधिकारी आणि जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी हे पात्र तथा इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागवून नियुक्ती आदेश देतील.

शिक्षकांच्या नियुक्तीची सर्व प्रक्रिया आयुक्तांच्या नियंत्रणाखाली पार पडणार आहे. कंत्राटी शिक्षकांना नियुक्त करताना शिक्षणाधिकाऱ्यांबरोबर करारनामा करावा लागणार आहे. नियमित शिक्षक भरतीमधून शिक्षक उपलब्ध होईपर्यंत, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांतील आणि खाजगी शिक्षण संस्थांच्या अनुदानित शाळांतील सेवानिवृत्त शिक्षकांमधून कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरूपात जिल्हा परिषद शाळांतील रिक्त शिक्षकीय पदे भरण्यात येणार आहेत. त्यासाठी काही तरतुदी केल्या आहेत.

सरकारी सुपिक डोक्यातील भन्नाट कल्पना अशी की, हल्ली राज्यात प्राथमिक शिक्षकांच्या १८ हजार ४६ जागा रिक्त आहेत. राज्यातील सर्व शाळा मागील जून महिन्यातच सुरू झाल्या आहेत. जिल्हा परिषद शाळांतील शिक्षकांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची भिती निर्माण झाली आहे. नियोजित शिक्षक भरतीसंदर्भात उच्च न्यायालयात दाखल रिट याचिकांमुळे भरती प्रक्रियेस विलंब होत असल्याचे शासनाच्या चटकन लक्ष्यात आले आहे. ही सर्व परिस्थिती विचारात घेऊन पवित्र प्रणालीमार्फत नियमित शिक्षक भरतीमधून शिक्षक उपलब्ध होईपर्यंत सेवानिवृत्त शिक्षकांमधून कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरूपात जिल्हा परिषद शाळांतील रिक्त शिक्षकीय पदे आततायीपणे भरण्यात येत आहेत. हीच भरती बेरोजगार युवकांमधूनही घेता आली असती. तेवढेच समाधान जनतेच्या मुखमंडलांवर झळकताना दिसले असते. अशी हास्यास्पद गोष्ट वाटलीच नसती. मी मधुमेह आजाराने त्रस्त असल्याने योग्य प्रकारे सेवा बजावू शकत नाही आणि नोकरीसाठी धडपडणाऱ्या एका युवकास आपली जागा लवकर रिक्त व्हावी म्हणून मी आठ वर्षाचा सेवाकाळ शिल्लक असूनही जुलै २०२०मध्येच स्वेच्छा निवृत्ती स्वीकारली. माझ्या दयाळू मायाळू सेवानिवृत्त शिक्षक बांधवांनी आमच्या बेरोजगार मुलांचा सकारात्मक विचार डोळ्यासमोर ठेवून या भरतीप्रक्रियेवर एकजुटीने बहिष्कार घालावे, असे माझे वैयक्तिक मत आहे. सविस्तर लक्षपूर्वक वाचल्याबद्दल धन्यवाद!

# विधानपरिषद सदस्य नियुक्तीचा वाद आणि राजकारण



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रात आमदारांची पदे गेली दोन-तीन वर्षे रिक्त असून महाविकास आघाडी सरकारने पाठविलेली बारा आमदारांची नावे तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी मंजूर केली नव्हती किंवा ती फेटाळलीही नव्हती. शिंदे-फडणवीस सरकार सत्तेवर आल्यावर महाविकास आघाडी सरकारने पाठविलेली यादी रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला.**

त्याला रतन सोहली यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिल्यावर न्यायमूर्ती के. जोसेफ यांच्या नेतृत्वाखालील पीठाने या नियुक्त्यांना स्थगिती दिली होती. या याचिकेत सुनील मोदी हे सह याचिकाकर्ते (इन्टरव्हीनर) म्हणून सहभागी झाले होते. न्यायमूर्ती जोसेफ सेवानिवृत्त झाल्याने सरन्यायाधीश डॉ. धनंजय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील पीठापुढे याचिकेवर सुनावणी झाली. अर्जदारांनी याचिका मागे घेतल्याने स्थगिती उठविण्यात आली, मात्र मोदी यांचे आक्षेप कायम असल्याने त्यांना स्वतंत्र याचिका सादर करण्याची सूचना करण्यात आली आहे. ही याचिका तातडीने सादर करण्यात येत असून काही दिवसांनी ती सुनावणीसाठी येईल. पण सध्या तरी स्थगिती नसल्याने सरकारने बारा आमदारांसाठी यादी पाठविल्यास राज्यपालांना नियुक्त्यांचे आदेश जारी करता येईल. आपल्या अडीच वर्षांच्या कारकिर्दीत, एमव्हीएने दोनदा एमएलसी उमेदवारांच्या याद्या दिल्या होत्या, परंतु राज्यपाल कोश्यारी यांनी तांत्रिक किंवा कायदेशीर समस्यांचे कारण देत त्या स्वीकारण्यास नकार दिला. वादात सापडल्यानंतर हे प्रकरण न्यायालयातही पोहोचले. एमव्हीएने तेव्हा आरोप केला होता की कोश्यारी हे भाजपच्या वतीने काम करत होते, जे राज्यात विरोधी पक्षात होते परंतु केंद्रात सत्तेत होते. महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात विधानपरिषदेतील सदस्यांच्या नामनिर्देशनाचा विषय एवढा प्रदीर्घ काळ लटकण्याची ही बहुधा पहिलीच वेळ असावी. मात्र, राज्यपालांनी ठराविक मुदतीत सरकारच्या शिफारशींवर निर्णय घ्यावा, अशी कोणतीही तरतूद घटनेत नाही. पण याचा अर्थ असा नाही की सरकारच्या शिफारशी कायमस्वरूपी ठेवण्याचा अधिकार राज्यपालांना मिळाला आहे. सत्ताधारी पक्षाच्या सूचनेनुसार अनेकदा राज्यपाल पदाचा गैरवापर केल्याची अनेक उदाहरणे आहेत.राज्यपाल नियुक्तीची प्रक्रिया हे त्याचे प्रमुख कारण मानले जात आहे. अनेक प्रकरणांमध्ये विशिष्ट राजकीय विचारसरणी असलेले राजकारणी आणि माजी नोकरशहा यांची केंद्र सरकारकडून राज्यपाल म्हणून नियुक्ती केली जाते केंद्र सरकारची मर्जी राखण्यात राज्यपालअसतात त्यामुळे राज्यपालाला घटनात्मक निर्णय घेताना अडचणी येतात. राज्यपाल हा राज्याचा मुख्य कार्यकारी प्रमुख देखील असतो, जो संबंधित राज्याच्या मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार आपले काम करतो. शिवाय, राज्यपालांची दुहेरी भूमिका असते, कारण ते 'केंद्र सरकारचे एजंट' म्हणूनही काम करतात. राज्यपाल हे राज्यघटनेच्या अनुच्छेद १६३, १६४ नुसार मुख्यमंत्री व मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने काम करतात. राज्यपालांना काही स्वेच्छाधिकार आहेत. विधान परिषदेवर विविध क्षेत्रातील सदस्यांची नियुक्ती हा स्वेच्छाधिकारात मोडत असला तरी कोणत्याही राज्यपालांनी सरकारला न विचारता परस्पर नियुक्त्या केलेल्या नाहीत. केंद्र व राज्यात वेगवेगळ्या पक्षांची सरकारे असली, तर राज्यपाल व राज्य सरकारचा संघर्ष होऊ शकतो. उत्तर प्रदेशात राज्यपालांनी सरकारने पाठविलेली सदस्यांची यादी मंजूर न करता त्यात बदल सुचविले होते व वर्षभराचा कालावधी यादी मंजूर करण्यास लागला होता.



# पसायदान : अहिंसक समाजरचनेची आचारसंहिता



बलराज संघई
9420015108

आधुनिक केसरी

**मानसिक शांतीसाठी अहिंसा ही आवश्यक आहे परंतु समाजाच्या संतुलित विकासासाठी देखील अहिंसेचे मूल्य कमी नाही. मुळात समाजाची रचना अहिंसेच्या आधारावर झालेली आहे. जर मनुष्य एक दुसऱ्यास हिंसक प्राण्यांप्रमाणे संपवण्यासाठी धावला असता तर समाजाचे निर्माणच झाले नसते. एकमेकांच्या हितामध्ये बाधा न आणण्याचा विचार हाच सामाजिक जीवनाचा सुदृढ आधारस्तंभ आहे. म्हणूनच केवळ हिंसक समाजाची कल्पना देखील केली जाऊ शकत नाही. निष्कर्षाच्या भाषेत असे म्हटले जाऊ शकते की समाज मात्र हिंसेच्या आधारावर टिकू शकत नाही. भारतीय धर्मशास्त्रांमध्ये आणि सर्वच प्रमुख साधुसंतांनी आपल्या मुख्य तत्वांमध्ये अहिंसेला समाविष्ट करुन अधिक महत्त्व दिले आहे. भगवान महावीरांनी अहिंसा हा परमधर्म आहे असे म्हटले तर भगवान गौतम बुद्धांनी अहिंसा दया करुणा हे जीवनाचे आवश्यक अंग मानले.**

महात्मा गांधींनी देशाला स्वातंत्र्य मिळवून देत असताना अहिंसेच्या मार्गाचा अवलंब केला व अहिंसेचा आग्रह करत सत्यग्रहाच्या मार्गाने अनेक लढे दिले. गांधीजींनी मोठ्या प्रमाणावर अहिंसेचे सामाजिक स्वरूप स्पष्ट केले.

भारतीय धर्म तत्त्वज्ञानांमध्ये मनुष्य जीवनाचा मुख्य उद्देश मोक्ष प्राप्ती हा सांगितलेला आहे तर त्यासाठी अहिंसेचा मार्ग अवलंबून याचा आग्रह केला आहे. हिंसा रहित आणि स्वस्थ समाजामध्ये मनुष्य आपल्या जीवनामध्ये व्यावहारिक हित साधत साधत मोक्ष मार्गाचा अवलंब करतो.

संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींनी ग्रंथराज ज्ञानेश्वरी ची रचना केली. व अखेरीस समाजाच्या हितासाठी पसायदानाचे निर्माण केले. अहिंसक समाज रचनेच्या दृष्टीने मला हे पसायदान अत्यंत महत्त्वाचे आणि मोलाचे वाटते. इतकेच नव्हे तर आहेत समाज रचनेचा पसायदान हा पायाभूत आधारस्तंभ वाटतो.

**आतां विश्वात्मके देवे ।येणें वाग्यज्ञे तोषावें ।**
**तोषुनि मज द्यावें ।पसायदान हें ।।**

आत्मज्ञानाने परिपूर्ण असलेला अतिशय विद्वान महापुरुष निवृत्तिनाथ हे ज्ञानेश्वरांचे सद्गुरु आहेत तोच विश्वात्मकु देवु आहे असे ज्ञानदेव म्हणातात.त्यांनी या यज्ञाने संतुष्ट होऊन आपणास विश्वातील समस्त मनुष्य प्राण्यांच्या कल्याणासाठी पसायदान द्यावे ही ज्ञानेश्वरांची पहिली प्रार्थना !

**जे खळांची व्यंकटी सांडो ।तया सत्कर्मी रती वाढो**
**भूतां परस्परें पडो ।मैत्र जीवाचे ।।'**

या ओवीमध्ये तीन गोष्टी मागितल्या आहेत : खळ म्हणजे दुष्ट. व्यंकटी म्हणजे कुटिलपणा. जेवढे वाईट आचरण आहे वाकडेपणा आहे त्याला व्यंकटी म्हणायचे. खळांच्या म्हणजे दुष्टांच्या अंतःकरणामधील कुटिलपणा जावो ही पहिली मागणी आहे. कुटिलपणा गेल्यानंतर तया सत्कर्मी रती वाढावी, सत्कर्मे त्यांच्या हातून घडावीत आणि त्यामध्ये त्यांना गोडी निर्माण व्हावी असे दुसरे मागणे मागितले अवघ्या प्राणिमात्रांची परस्परांशी मैत्री व्हावी आणि त्यामुळे अवघ्या प्राणिमात्रांचे कल्याण व्हावे. माणसातला दुष्टपणा गेला म्हणजेच तो उरलेला माणूस समाजासाठी हिताचाच असेल. असा सरळ सुस्वाभावी व्यक्तीच अहिंसक समाजाचा आधारभूत महत्त्वाचा घटक असेल असे ज्ञानदेवांना अभिप्रेत होते.

**दुरितांचे तिमिर जावो ।विश्व स्वधर्मसूर्ये पाहो ।**
**. जो जे वांछील तो ते लाहो प्रणिजात ।।**

दुरित म्हणजे पाप , तिमिर म्हणजे अंधार! पापरुपी अंधार नाहिसा होऊ दे .आता तिमिर जाण्यासाठी सूर्योदय झाला पाहिजे.ज्ञानेश्वरांना जो सूर्य अभिप्रेत आहे तो स्वधर्मरुपी सूर्य आहे.तो उदयाला येवो अशी दुसरी विनंती आहे. ज्ञानेश्वरांची ही मागणी विश्वातील सर्व प्राणिजाती साठी आहे.जो जे वांछील म्हणजे ईच्छा करील ती वस्तू किंवा गोष्ट त्याला प्राप्त होवो अशा या अलौकिक मागण्या आहेत की ज्या मुळे ज्ञानदेवांचे हे पसायदान वैश्विक पातळीवर स्वस्थ समाज रचनेच्या मांडणीच्या संकल्पाकडे पोहचले आहे.



**वर्षत सकळ मंगळीं**
**ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।**
**अनवरत भूमंडळीं ।भेटतु**
**भूतां ।।'**

संपूर्ण कल्याणाचा वर्षाव करणारी ईश्वरनिष्ठांची मांदियाळी सर्व प्राणिमात्रांना अनवरत म्हणजे निरंतर भेटत राहो असे मागणे मागितले आहे. ज्ञानेश्वर म्हणतात,जे ईश्वरनिष्ठ आहेत त्यांची मांदियाळी म्हणजे समुदाय एकत्र येऊन सर्व प्राणिमात्रांवर संपूर्ण कल्याणाचा वर्षाव करु दे । ज्यांच्यामध्ये परस्पर बंधु भाव स्व- पर कल्याणाची प्रबळ इच्छा आणि राग देशाचा अभाव आहे तेच खरे ईश्वरनिष्ठ. ज्ञानदेवांचा हा प्रबळ विश्वास अहिंसक समाज रचनेच्या दृष्टीने ही अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

**चलां कल्पतरुंचे आरव ।चेतनाचिंतामणींचे गाव .**
**बोलते जे अर्णव ।पीयूषाचे**

हा ईश्वरनिष्ठांचा समुदाय नसून जणू काही नाना वृक्षवेलींनी,फुलाफळांनी बहरलेले सुंदर उपवन ( आरव ) आहे. हे आरव असामान्य आहे हे इच्छिलेले फळ देणाऱ्या कल्पवृक्षांनी व्यापलेले आहे. अशा प्रकारच्या बंधुभाव संपन्न ईश्वरनिष्ठ व्यक्तींना ज्ञानदेव कल्पतरू असे संबोधतात आणि हे कल्पतरु अलौकिक आहेत कारण ते एका ठिकाणी स्थिर राहाणारे नसून चल म्हणजे चालते,बोलते असेच आहेत. ही ईश्वरनिष्ठांची मांदियाळी नसून जणू काही चिंतामणीचे गाव च आहे, ज्ञानदेवांना अभिप्रेत असलेल्या समाजातील घटक व्यक्ती हे या प्रकारचे आहेत .चिंतामणी मनातिल ईच्छा पूर्ण करणारा काल्पनिक ,अचेतन मणी असतो पण संतरुपी चिंतामणी सचेतन असून जनकल्याणा साठीं भक्तीचे अमृत कुंभ घेऊन अमृत वाटत निघाले आहेत.ह्या ईश्वरनिष्ठांच्या मांदियाळी साठी संत ज्ञानेश्वरांनी आणखी एक अनन्यसाधारण उत्प्रेक्षा वापरली आहे.ते म्हणतात,हा संत समुदाय नसून अर्णव म्हणजे सागर आहेत.पण हा अर्णव सचेतन असून जनसामान्यांच्या कल्याणा साठी त्यांना भक्तिरुपी अमृताचे ( पीयुषाचे ) पान घडवतात. अशा प्रकारच्या उत्तम व्यक्तींनी बनलेला समाज हा खऱ्या अर्थाने अहिंसक समाज असेल.

**चंद्रमे जे अलांछन ।मार्तंड जे तापहीन ।**
**ते सर्वांही सदा सज्जन ।सोयरे होतु ।।**

पौर्णिमेचा पूर्ण चंद्र जरी बघितला तरी त्याच्यावर डाग असतो पण ईश्वरनिष्ठ संत व्यक्ती निष्कलंक असतात.मार्तंड म्हणजे सूर्य तेजाचा झगझगीत अग्नीगोल,तो तापहीन असूच शकत नाही.पण संत हे ज्ञानरुपी मार्तंड आहेत.त्याचे तेज दाहक नसून शीतल आहे.ते ज्ञानाचा प्रकाश देऊन अविद्येचा नाश करतात पण अगदी सौम्यपणे. संत ज्ञानेश्वर सांगतात की ते संत सज्जन तुमचे सोयरे होऊ देत आणि तुम्हाला सर्व सुखाचा लाभ होऊ दे. अशा प्रकारच्या समाज घटकांनी गुंफलेला समाज हाच खरा अहिंसक समाज, संत श्रेष्ठ ज्ञानदेवांनी अशाच समाजाची कल्पना केली आहे.

**किंबहुना सर्वसुखी ।पूर्ण होऊनि तिहीं लोकीं**
**भजिजो आदिपुरखीं ।अखंडित ।।**

एवढे पसायदान गुरूकडे मागून झाले.आणि मग ज्ञानेश्वर माऊली म्हणतात,किंबहुना म्हणजे काय तर त्रैलोक्य सर्व सुखाने पूर्ण होऊन त्याने आदिपुरुषाची अखंडित उपासना करावी,भजन करावे.ज्ञानेश्वर हे विश्वमानव आहेत.त्यांचे मागणेही अत्यंत व्यापक स्वरुपाचे आहे.ते जे दान मागत आहेत ते केवळ पृथ्वीवरील मानवासाठी नाही तर स्वर्ग,पृथ्वी,पाताळ सर्वांसाठी आहे.तिन्ही लोकं परिपूर्णहोऊन आदिपुरुषाला शरण जावो.

आणि ग्रंथोपजीविये ।विशेषी लोकीं इयें ।
**दृष्टादृष्टविजयें ।होआवें जी ।।"**

**ग्रंथोपजीविये' म्हणजेच हा ग्रंथ हेच तुमचे जीवन होऊन जावो.किंवा तुमचे जीवन ग्रंथरुप होऊन जावो.ग्रंथामध्ये वर्णिलेला आत्मसाक्षात्कार प्रत्यक्ष तुमच्या अनुभवास येवो.**

**येथ म्हणे श्रीविश्वेशरावो ।हा होईल दानपसावो ।**
**येणें वरें ज्ञानदेवो ।सुखिया झाला ।।**

विश्वेश्वर संतुष्ट झाला आणि तथास्तु म्हणाला.' हा होईल दानपसावो।' तो कृपाप्रसाद सर्वांना लाभेल असे वरदान सद्गुरुंकडून मिळाले त्यामुळे ज्ञानेश्वरांना अतीव सुख झाले. खळांची व्यंकटी सांडेल,सत्कर्मी रती वाढेल ,सर्व प्राणिमात्रांची परस्परांशी मैत्री होईल.अज्ञानाचा ,पापाचा अंधःकार नाहिसा होईल,विश्वात स्वधर्मरुपी सूर्य उदयाला येईल,प्राणिमात्रांच्या मनातिल सर्व इच्छा संपूर्ण होतील,ईश्वरनिष्ठांची मांदियाळी या भूतलावर प्रकट होईल,सर्वांना आत्मकल्याणाचा मार्ग सुकर होईल.जे साक्षात् कल्पतरुंची वने आहेत,चेतना चिंतामणींची गावे आहेत,अमृताचे महासागर आहेत,येथील संत सज्जन सूर्यासारखे तेजस्वी असूनही दाहक नाहीत,चंद्रासारखे शीतल असूनही निष्कलंक आहेत.हे सगळे प्राप्त होईल असा कृपाप्रसाद सद्गुरुंकडून मिळाला आहे आणि संत ज्ञानेश्वरांचे पसायदान सिध्दीस गेले आहे. ज्ञानदेवांना अभिप्रेत व्यक्ती समाजाचा घटक हा या प्रकारचा आहे, तो केवळ माणूस इतकाच नसून संत सज्जन असाच आहे. समता, बंधुभाव, स्व-पर कल्याणाची इच्छा करत सह अस्तित्वाने प्रेमाने देणे करून येणे जगणारा व्यक्ती, आणि अशाच अनेक व्यक्तींनी बनलेला समाज हा खऱ्या अर्थाने अहिंसक समाज असेल अशी ज्ञानदेवांची जगाच्या कल्याणासाठी इच्छा आहे. म्हणूनच ज्ञानदेव खऱ्या अर्थाने माऊली पदाची प्रतिष्ठा सन्मान वाढवतात. यामुळेच ज्ञानदेवांनी आरंभलेला जगाच्या कल्याणाचा यज्ञ या करुणा रूपाने पूर्ण होत असताना हीच खरी अहिंसक समाज रचनेची आचारसंहिता आहे असेच मला वाटते.

# आता एकच सवाल! नेते तुम्ही कोणत्या गटात ?



सुशील गायकवाड
संपर्क क्र.: 9309474068

आधुनिक केसरी

**महाराष्ट्राच्या राजकारणात एक असा पक्ष आहे की त्या पक्षातील नेते मंडळी आपल्याच पक्षा सोबत असावे असे इथल्या प्रत्येक प्रमुख राजकीय पक्षाला वाटत असते.आम्ही जिथे जातो तिथे सत्ता असते.असा दावा सुद्धा या पक्षातील नेत्यांकडून केला जात असतो.वेगवेगळ्या गटाने तो पक्ष राजकारणात वेगवेगळ्या पक्षांसोबत युती आघाडी करून निळा झेंडा हातात घेत आपली राजकीय ताकद दाखविण्याचा प्रयत्न करत असतो. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया असे या पक्षाचे नाव असून या पक्षाचे सुद्धा अनेक गट राजकारणात दिसत असतात. न्याय मिळविण्यासाठी रस्त्यावर उतरणे,अनेक आंदोलने,मोर्चा करणे हे पक्षासाठी व नेत्यांसाठी काही नवीन नाही. रिपब्लिकन पक्षाचे गट जरी वेगवेगळे पाहायला मिळत असले तरी दलित पँथरच्या काळात हेच नेते आक्रमक भूमिका घेत अन्यायाच्या विरोधात लढत होते.**

ही धार कालांतराने गटा तटात विभागली गेली. एकीचे उत्तम संघटन जेव्हा तयार होत असते तेव्हा त्यास छेद देणारे अनेक फोडा फोडीचे प्रकार घडत असतात. हे प्रकार रिपब्लिकन नेत्यांच्या बाबतीत ही घडलेले आहेत. सांगण्याचा हाच मुद्दा आहे की,ज्या रिपब्लिकन पक्षाबद्दल आज अनेक गट तट असल्याचे बोलले जाते. आज असेच गट तट पडण्याची प्रक्रिया जणू इतर पक्षांमध्ये येऊ लागली आहे. जो सवाल रिपब्लिकन पक्षा बाबत नेमका तुमचा गट कोणता, तुम्ही कोणत्या गटाचे असे नेते कार्यकर्ते पदाधिकारी यांना विचारले जात असते. तेव्हा हाच प्रश्न आता आजच्या शिवसेना, राष्ट्रवादीत निर्माण झालेल्या या दोन गटाबाबत लागू होऊ लागला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतून स्थापन झालेल्या रिपब्लिकन पक्षाबद्दल त्या पक्षातून काम करणाऱ्या नेत्यांना कार्यकर्त्यांना पदाधिकाऱ्यांना नेमके तुम्ही कोणत्या गटाचे असे म्हटले जाते तेव्हा हा पक्ष बाबासाहेबांच्या विचारांचा आहे हे सांगायला ते अजिबात विसरत नाहीत. दोन्ही गटातील शिवसेना म्हणते आम्ही बाळासाहेब ठाकरे यांचे विचार घेऊन जात आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे दोन्ही गट शरद पवारांचाच आशीर्वाद आमच्या पाठीशी असल्याचे म्हणत आहेत. पक्ष तोच असतो परंतु पक्षाचे मूळ तेच पुढे घेऊन काम करावे लागत असते. कारण ज्या विचारातून पक्ष उदयास आलेला असतो त्या विचारांची बांधीलकी सुद्धा त्या पक्षा सोबत जोडलेली असते. पक्षाचे कितीही गट झाले तरी पक्षाची विचारसरणी मात्र तीच राहत असते. परंतु पक्ष गटा तटात विभागून जात असतो तेव्हा पक्षाचे अस्तित्व मात्र धोक्यात येत असते. मीच नेता, मलाच सर्व हवे अशा मानसिकतेने पक्ष आणि नेता पण मर्यादित कक्षेपर्यंत राहत असतो.रिपब्लिकन पक्ष वाढलाच नाही. रिपब्लिकन पक्षाच्या गटाबद्दल सांगण्याचा हाच हेतू होता की ज्या रिपब्लिकन पक्षातील नेत्यांना कधीही एकत्र येऊ दिले जात नव्हते ते सर्व गट आजही कुठे काँग्रेस,राष्ट्रवादी, भाजप, शिवसेना या प्रत्येक पक्षासोबत संसार थाटलेले आहेत.रिपब्लिकन पक्ष हा गटातच राहिला पाहिजे. तो कधीच एकीमध्ये आला नाही पाहिजे. याची काळजी सुद्धा इथल्या प्रमुख राजकीय पक्षांनी घेतलेली आहे.पक्ष हा फुटीर स्वरूपात ठेवण्याची किमया वारंवार प्रत्येक निवडणुकीत पार पाडली गेली. सत्ता कारण म्हणजेच राजकारण होय.ही सत्ता मिळविण्यासाठी कोणतेही उपाय अंमलात आणण्याची प्रकिया केली जात असते.ज्यांच्या वर भ्रष्टाचाराचे आरोप होत आहेत.तेच भ्रष्टाचार मुक्त बनत आहेत.सत्तेचा भाग बनून एकाचे दोन तुकडे केले जात आहेत. मुदामहून सुद्धा करावे लागत आहेत.आपले अस्तित्व अबाधित ठेवण्यासाठी राजकीय खेळया कराव्या लागत आहेत.राजकीय संस्कृतीत विकृती निर्माण झाल्याने हेच राजकारण



आता नेत्यांना नव्हे तर जनतेलाच नकोसे झालेले आहे. शिवसेना सारखा आक्रमक असलेला प्रादेशिक पक्ष फुटतो, नागालँड राज्यात आमदार निवडून आलेल्या शरद पवारांना सुद्धा पक्ष फुटीच्या राजकारणास समोरे जावे लागत आहे. हेच गटा तटाचे राजकारण आपल्याच अवती भवती येईल. याची कल्पना सुद्धा उद्धव ठाकरे आणि शरद पवार याना आली नसेल. इथे फुटा फुटी नंतर पक्षावर दावा करणारी मानसिकता सुद्धा आहे. गेल्या एक वर्षा पूर्वी ज्या पद्धतीने शिवसेना फुटीच्या नाट्यमय घडामोडी घडल्या गेल्या. पक्षनिष्ठेवर प्रश्न चिन्ह उपस्थित होऊ लागले. ज्या पक्षात सर्वांनी एकत्रित राहुन काम केले.त्यांनाच एकमेकांच्या विरोधात आरोप प्रत्यारोप, टीका टिप्पणी करावी लागत आहे. आपल्याच पक्षातील नेत्यांवर कार्यकर्त्यांवर पदाधिकाऱ्यांवर गद्दार म्हणण्याची वेळ आली.याचे कारण म्हणजे पक्षाची झालेली दुफळी व गटात विभागले गेलेले दोन विभक्त गट होय.मूळ पक्ष बाजूला पडून पक्ष हा दोन गटात आल्याने पक्षाची ताकद तर कमी झालीच.परंतु जेव्हा पक्ष संपविण्याची यंत्रणा काम करायला लागते तेव्हा पक्षाचे अस्तित्व कसे टिकवून ठेवावे लागेल यासाठी सुद्धा संघर्ष करावा लागेल. याची प्रचिती सुद्धा दोन्ही गटातील नेत्यांना आली आहे. आज राज्यातील गाव शहर मोहल्ला या ठिकाणी तुमचा नेमका गट कोणता असे जेव्हा विचारले जाते तेव्हा तुमचे संघटन हे कमकूवत होत चाललेले आहे. हे सत्य स्वीकारावे लागेल. निवडणुकीच्या रिंगणात मतांची विभागणी तर होणारच आहे. शिवाय जिथे आपल्याला विजयाची खात्री असते. तिथे आपल्या पक्षाला विजय मिळेल की नाही याची खात्री सुद्धा देता येत नाही. पक्ष फुटतो, बंडखोरी होते, ती करायची वेळ येते हे सर्व काही सत्तेच्या सारीपाटावर खेळ खेळणाऱ्या सत्ताधीशांना सुद्धा यातून जावे लागलेले आहे.याचा प्रत्यय हल्लीच्या राजकारणातून येऊ लागला आहे.राजकारणात कुणीच कुणाचा दुष्मन नसला तरी राजकीय सत्तेची गोळा बेरीज करताना जे भ्रष्टाचाराचे आरोप केले जात असतात त्यातून मात्र मुक्तता मिळविण्याची किल्ली सत्तेचीच चावी देत असते. आज अनेक राज्यात अनेक प्रादेशिक पक्षातून सुद्धा पक्ष फुटीचे आव्हाने पुढे येऊ लागलेली आहेत. याची कारणे जरी अनेक स्वरूपाची असली तरी पक्ष फुटीची वेळ तर यायला लागली आहे.परंतु ज्या पद्धतीने राजकारण केले जाते आहे. ते राजकारण मात्र घातक ठरत आहे.महाराष्ट्रात शिवसेना आणि राष्ट्रवादी वर आलेली वेळ,मूळ पक्ष आणि त्याचे अस्तित्व पूर्णपणे गटात विभागल्याने व हे असेच चित्र पुढेही राहिले तर या पक्षांची राजकीय अवस्था येणाऱ्या काळात कशी असू शकते याचे विचारमंथन होणे अपेक्षित आहे. कारण कोणत्या परिस्थितीत कोणते निर्णय घेऊन,कोणती राजकीय उलटा पालट झाली. यातूनच पुढे पक्षाचे भवितव्य असणार आहे. गेल्या वर्षी महाविकास आघाडीला जोरदार झटका देत आघाडीतील शिवसेना फुटली अन तीन चाकी सरकारची गाडीच पलटी झाली. यातून शिवसेना ( शिंदे गट ) आणि भाजपचे सरकार स्थापन झाले. मूळ शिवसेनेचा उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे गट उदयास आला. पक्ष चिन्ह एकनाथ शिंदे गटाकडे आले असले तरी पक्षाची दोन शकले गटात विभागली गेली आहेत.तशीच परिस्थिती राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या बाबतीत झालेली आहे.शरद पवार आणि अजित पवार असे दोन गट महाराष्ट्राच्या राजकारणात दिसत आहेत.७० हजार कोटीच्या भ्रष्टाचाराच्या आरोपा नंतर राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाला भाजपची विचारसरणी आपलीसी वाटू लागली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाला पुढे घेऊन जाण्याची स्वप्ने दिवसा पडू लागली,.ज्या नरेंद्र मोदींवर टीका होत होती,ज्या भाजपाचा सडकून समाचार घेतला जात होता. तेच नरेंद्र मोदी व भाजपा देशाच्या विकासाचे वाटू लागलेले आहेत. आधी टीका मग कौतुक असे राजकारण होत आहे. अशा या राजकारणाची वेळ राष्ट्रवादीवर आली.पण यातून राष्ट्रवादीचे दोन गट झाल्याने आता एकच सवाल विचारला जात आहे. नेते तुम्ही कोणत्या गटात आहात ? यावर मात्र आजही अनेकांची सावध भूमिका येत आहे. कारण ज्या पक्षा सोबत काम केले त्याच पक्षात गटाची विभागणी होते हे कायकर्ते पदाधिकारी नेते यांना ही पटलेले नाही.

# महापुरुषांच्या विचारधारेचे मिथ्या प्रचारक !



भिमराव परघरमोल
मो.नं. 9604056104

आधुनिक केसरी

**महापुरुषांच्या तथा संतांच्या वैचारिक परंपरेने नटलेली महाराष्ट्र भूमी आजकाल राजकीय घडामोडींचा आखाडा बनलेली दिसत आहे. जिथे प्रत्येक पहिलवान एकमेकांना धोबीपछाड देऊन चितपट करू इच्छिते. अशावेळी अडचण निर्माण होते ती संतमहापुरुषांच्या विचारधारेच्या मिथ्या प्रचारकांची! मागील काही दिवसांपासून नेत्यांबद्दल आश्चर्य वाटण्या इतपतही कुतूहल शिल्लक न राहिल्याचे जनमानसात दिसून येते. परंतु ज्यांनी भाषण-संभाषणाच्या कौशल्यावर आपलं अस्तित्व निर्माण करून ती निष्ठा कोणाच्यातरी पायी लोळण घातली. तरीही मी पुरोगामीत्वाचाच पाईक अशी आवई उठवत असतानाच आता मात्र सर्वसामान्यांच्या प्रश्नोत्तरात बोबडी वळताना दिसली.**

होय मी मम म्हणणार, माझे सर्व कुटुंब हिंदूच, म्हणजे ब्राह्मणी धर्माप्रमाणेच आचरण करते" असे नकळत पोटातलं ओठात आलं. आणि लक्षात येताच सावरताना दमछाक झाली. "मी सॉफ्ट कॉर्नर म्हणून मला ट्रोल करतात" असं म्हणताना, हे विसरले की, याच चाहत्यांनी आपणास डोक्यावर घेऊन सवंग प्रसिद्धीच नव्हे तर आपले आर्थिक लाडही पुरवले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संघटन शास्त्राचा नियम सांगताना म्हणतात की, 'व्यक्ती ( नेता ) आणि संघटन यामध्ये द्वंद होत असेल, तर संघटनेला प्राधान्यक्रम द्यावा. संघटन आणि विचारधारा यामध्ये द्वंद होत असेल, तर संघटनेला सोडचिठ्ठी देऊन विचारधारा जोपासावी'. याचाच अर्थ असा की, व्यक्ती आणि संघटनेपेक्षाही विचारधारा महत्त्वाची, कारण ती दिशादर्शक असते. संघटनेमध्ये अनेक व्यक्तींचा भरणा असतो त्यांच्या विचारांसह भौगोलिकतेतही विविधता असू शकते. त्यांच्या प्रकृती, प्रवृत्ती तथा आवडी-निवडी वेगवेगळ्या असू शकतात. तरीही संघटनेमध्ये त्यांना एकसंघ ठेवून साधण्याचं कार्य विचारधाराच करत असते. परंतु आज काल काही मिथ्या प्रचारक विचारधारेपेक्षा संघटना आणि संघटनेपेक्षाही व्यक्ती श्रेष्ठत्व जोपासताना दिसतात. ही बाब लोकशाहीला मारक ठरून, विचारधारेतील आस्थेवाईकांच्या आस्थेचाही अपमान ठरवू पाहते.

इतिहास साक्ष देतो की, बुद्धापासून तर गाडगेबाबांपर्यंत जी काही संत-महापुरुषांची मालिका भारत देशाला लाभली त्यांनी प्रचलित तथा प्रस्थापित समाज व्यवस्थेच्या विरोधात जाऊन बहुजन-हिताय, बहुजन-सुखाय अशी व्यवस्था निर्माण केली. त्यासाठी त्यांना खूप त्याग, कष्ट, दुःख सहन करून समर्पित जीवन जगावे लागले. त्यामधून त्यांची एक विशिष्ट अशी समतावादी, सर्वसामावेशक विचारधारा निर्माण झाली. त्या विचारधारेचा प्रचार-प्रसार करताना महापुरुषांना खूपच त्रास सहन करून खस्ता खाव्या लागल्या. प्रस्थापितांचे विषमतावादी विचार लोकांच्या अंगवळणी पडलेले असल्यामुळे, त्यांच्या सद्विवेकाला आव्हान करणे मोठे जिक्रीचे आणि जीवावर बेतणारे होते. तरीही मैदानातून एकही पाऊल मागे घेतल्याचे उदाहरण नाही. त्यामुळे त्यांना खुनाच्या धमक्या, मारेकऱ्यांकरवी हल्ले, बहिष्कृत ठरवणे, रक्ताच्या शाहीची पत्र, त्यांच्या अनुयायांना सळो की पळो करून सोडणे इत्यादीच नव्हे तर प्रसंगी प्राणासही मुकावे लागले. एवढे असून स्वतःसह विचारधारेचीही चिकित्सा करण्याचे स्वातंत्र्य बहाल करण्याचा मनाचा मोठेपणा त्यांच्याकडे दिसून येतो.

महापुरुषांसह संतांच्या विशेषता फुले, शाहू, आंबेडकरी विचारधारेचं नाणं जगात कुठेही घेऊन गेले तरी, खणाणल्याशिवाय राहत नाही. कारण त्या विचाराने ८५ टक्के बहुजनांना माणूसपण बहाल करत जीवनदान दिलं. त्या विचारधारेप्रती काहींनी कृतज्ञता पाळली, तर कित्येक कृतघ्न झाले. आपलं सर्वस्व, आपला मानमरातब, आपलं




अस्तित्व फक्त महापुरुषांमुळेच आहे हे ज्यांनी जाणलं त्यांनी परतफेडीचा मार्ग अंगीकारला. अशा कृतज्ञ लोकांना वेठीस धरून, मिथ्या प्रचारकांनी आपलं कौशल्य, आपली कला कामी लावून मोठ्या प्रमाणात विविधांगी लाभांवीत झाले. चार-दोन ग्रंथ वाचून, काही निवडक मर्मभेदी वाक्य व उत्तेजित करणारी शेरोशायरी विशिष्ट लय व तालसुरात श्रृत्यांच्या मनमस्तिष्कावर आदळली, विषमतेच्या विचारांना फक्त मीच संपवू शकतो, तुम्हाला काहीही करण्याची गरज नाही. असा खोटा आभास निर्माण करत त्याचे चित्रीकरण करून, त्यातील ठराविक चार-दोन मिनिटांच्या चित्रफिती बाजूला काढून समाज माध्यमांवर प्रसारित करणे, जेणेकरून जनमनाच्या लेखी आपलंच अधिराज्य असेल!

अशा पोटार्थी आणि स्वार्थाने बरबटलेल्या लोकांकडून जनतेची सदा-सर्वकाळ फसवणूक होणे शक्य नाही. कधीकाळी ते उघडे पडतातच, कारण त्यांच्या रक्तातच बेगडी प्रामाणिकता असते. काही काळ सर्व लोकांना फसवता येईल, सर्वकाळ काही लोकांना फसवता येईल, परंतु सर्वच काळ सर्वच लोकांना फसवता अथवा लुबाडता येणे शक्य नाही. मिथ्या प्रचारकांनी हे फक्त लक्षात ठेवलं पाहिजे. न्यूटनच्या गतीविषयक तिसऱ्या नियमानुसार लोक जेवढे डोक्यावर घेतात तेवढेच ते ठिकऱ्या-ठिकऱ्या होईपर्यंत जमिनीवर आढळतात हेही विसरून चालणार नाही. आज आपण मोठ्या पदासह सुख-ऐश्वर्य भोगत असलो तरी, भविष्य अंधारमय समजायला हरकत नसावी. लोकांच्या तिरस्कारयुक्त भावना काळजाला जेव्हा छिद्र पाडून त्याची चाळणी करतील तेव्हा आपल्यासारखा दुर्दैवी कोणीही नसेल. ज्यांनी-ज्यांनी समतावादी चळवळी सोबत गद्दारी किंवा बेईमानी केली त्यांचा इतिहास काळाकुट्ट असून त्यांना काळानेच धडा शिकवलेला आहे.

आज असे सिद्ध होऊ शकते की, मिथ्या प्रचारकांकडे प्रज्ञा आहे परंतु शील नाही. आणि बुद्ध म्हणतात की, शिलाशिवाय प्रज्ञा ही विध्वंसक बुद्धी ठरते. त्यामुळे त्यांची शील रहित प्रज्ञा समाजाची फसवणूक करणारच आहे यात तीळमात्र शंका नाही. परंतु समाजाने आता गाफील राहून चालणार नाही. बुद्धाने दिलेली कालाम सुत्तातील कसोटी समजून घेतली पाहिजे. खऱ्या-खोट्याची पारख करता आली पाहिजे. जवळचे लोक प्रामाणिकपणे काम करतात परंतु त्यांना सोडून मिथ्या लोकांच्या खोटारडेपणावर विश्वास ठेवणे, त्यांना डोक्यावर घेणे बंद करून प्रामाणिकपणे काम करणाऱ्यांच्या पाठीवर कधीकाळी शाबासकीची थाप दिल्यास त्यांनाही प्रोत्साहन मिळेल. त्यांच्याही कामाचा हुरूप वाढेल. अन्यथा चळवळीसह समाजाचे नुकसान होतच राहील, हेही नसे थोडके.

## मिस्तरी यांची रंधा कादंबरी अभ्यासक्रमात

आधुनिक केसरी न्यूज






**छत्रपती संभाजीनगर :** रंधा ही भाऊसाहेब मिस्तरी लिखित कादंबरीडॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद बी.ए. च्या अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आली आहे. मंडिल कॉलेज पनसांगवी जि. जालना बी. ए. ऑनर्स मराठी द्वितीय वर्ष सत्र चौथे सीबीसीएस पद्धतीनुसार जून २०२३ पासून लागू करण्यात आली आहे. भाऊसाहेब मिस्तरी यांची रंधा ही कादंबरी बहुचर्चित आहे. या कादंबरीवर अनेक मान्यवरांनी अनेक वृत्तपत्रातून नियतकालिकातून लेखन केलेले आहे. यासोबतच खान्देशी रेडू आणि गोरबोली रेडिओवर रंधा कादंबरीवर मान्यवरांनी लिहिलेल्या समीक्षांचे सलग १९ भागात प्रसारण करण्यात आले आहे. मराठवाडा साहित्य परिषदेने रंधा निर्मिती प्रक्रियेवर भाऊसाहेब मिस्तरी यांचे यापूर्वी व्याख्यान आयोजित केले होते. प्रा. डॉ. सर्जेराव जिंगे अध्यक्ष मराठी अभ्यास मंडळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांचे रंधा कादंबरी निवडी विषयक पत्रक भाऊसाहेब मिस्तरी यांना प्राप्त झाले आहे. साहित्य आणि सांस्कृतिक विभागातील अनेक मान्यवरांनी डॉ. भाऊसाहेब मिस्तरी यांचे अभिनंदन केले आहे आणि पुढील साहित्यिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



## सुलतानपूर परिसरात जनावरांचे लसीकरण

आधुनिक केसरी न्यूज

**सुलतानपूर :** खुलताबाद तालुक्यातील सुलतानपूर येथील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१च्या आंतर्गत जनावरांना होणाऱ्या लम्पि त्वच्या रोगाचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून प्रतिबंधक उपाय म्हणून लसीकरण मोहीम हाती घेतली आहे. सुलताननपूर पशुवैद्यकीय दवाखान्या अंतर्गत येणाऱ्या सर्व पशुपालकांनी आपल्या जनावरांना लसीकरण करून घ्यावे असे आवाहन डॉ.देविदास देशमुख यांनी केले आहे. यासाठी नानासाहे दांगोडे, संदीप घुले, साहिल राऊत, सुबोध जाधव,विशाल चव्हाण, अमोल दांगोडे आदी परिश्रम घेत आहे.

## सोयगाव रेशन दुकानातून मिळणार बँकिंग सुविधा : प्रदीप चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यात रेशन दुकानातून ऑनलाईन पैसे काढणे शक्य झाले आहे. राष्ट्रीय खाद्य सुरक्षा योजनेतील राशन दुकाने ही भारत सरकारची एक महत्वाची सार्वजनिक सुविधा आहेत. राष्ट्रीय खाद्य सुरक्षा अधिनियम 2013 अनुसार, गरीब, दुर्बल आणि पिछडलेल्या वर्गातील मानसिक विकासाच्या वाटेसाठी राष्ट्रीय खाद्य सुरक्षा योजनेच्या तत्वांच्या नियमित लोकांना सबसिडी देण्यात आलेली आहे. राष्ट्रीय खाद्य सुरक्षा योजनेतील रेशन कार्डधारकांना त्यांच्या राष्ट्रीय खाद्य सुरक्षा खात्याच्या माध्यमातून खाद्याची खरेदी करण्याची संधी मिळते. राष्ट्रीय खाद्य सुरक्षा खात्याच्या माध्यमातून तुम्ही राष्ट्रीय खाद्य सुरक्षा खात्याच्या दुकानातून पैसे काढू शकता. रेशन दुकानातून तुम्हाला पैसे काढता येणार आहे. रेशन दुकानातून किती पैसे काढता येणार आहे किंवा कोणत्या बँकेतून म्हणजे कोणते बँकेचे पैसे रेशन दुकानातून काढता येणार आहे.आता रेशनच्या दुकानावर फक्त रेशन धान्य मिळणार नाही तर बँकेतील उपलब्ध रक्कम याबाबतीत शासनाने नुकताच निर्णय जाहीर केला आहे.

रेशन दुकानाचे उत्पन्न वाढावे यासाठी या बँकिंग सुविधेचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. काही गावात बँकिंग सेवा उपलब्ध नसतात त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना पैसे काढण्यासाठी दूरपर्यंत जावे लागते याला उपाय म्हणून सर्वसामान्य नागरिकांना आता गावातच बँकिंग सेवा मिळणार आहे. आता इथून पुढे रेशन दुकानावर बँकिंग सेवा देखील मिळणार आहे. या बँकिंग सेवेतून रेशन दुकानदारांना जो काही व्यवहार होईल त्यातून कमिशन दिले जाणार आहे.अशी माहिती भाजपचे प्रदिप चव्हाण नादातांडा ता सोयगाव यांनी सांगितले.

## पुरात १० वर्षीय मुलगा वाहून गेला

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** संततधार पावसामुळे नाल्याला आलेल्या पुरात एक १० वर्षीय मुलगा वाहून गेल्याची घटना बुधवारी रात्री शहरातील खैर मोहम्मद प्लॉट परिसरात घडली. जियान अहमद इक्बाल कुरेशी (१०,रा. खैर मोहम्मद प्लॉट) असे वाहून गेलेल्या मुलाचे नाव आहे. अकोल्यात बुधवारी मुसळधार पाऊस झाला. या पावसामुळे ठिकठिकाणी पाणी साचले आहे. शहरातील नाले भरभरून वाहत आहेत. दरम्यान, खैर मोहम्मद प्लॉट येथे पावसाच्या पाण्यात जियान आणि त्याचे मित्र घराबाहेर खेळत होते.



# ग्रामीण भागातून शास्त्रज्ञ निर्माण होतील!

## विज्ञान संवादक धनंजय रावल यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** खरी गुणवत्ता ही देशातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्येच विखुरलेली असून त्यांना योग्य मार्गदर्शन आणि मेहनतीची जोड देता आली तर भविष्यातील उद्योजक आणि शास्त्रज्ञ ग्रामीण भागातीलच असतील असे प्रतिपादन विज्ञान संवादक धनंजय रावल यांनी केले .

येथील ज्ञानोपासक महाविद्यालयात अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष च्यावतीने उद्योजकता विकास विषयावर ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. श्रीधर भोंबे तर व्यासपीठावर डॉ. निंबाळकर, डॉ. दुर्गादास कान्हडकर, उपप्राचार्य एम. एस. दाभाडे हे उपस्थित होते. पुढे बोलताना धनंजय रावल म्हणाले की तुमच्या आवडीच्या क्षेत्रामध्ये मन लावून काम करा. गुण मिळविण्यासाठी काम करू नका तर चांगली गुणवत्ता निर्माण करण्यासाठी काम करा. येणाऱ्या काळात औंढा नागनाथ येथे होत असलेल्या लियगो प्रकल्पासाठी अनेक संशोधकांची गरज आहे आणि ते संशोधक या परिसरातूनच निर्माण व्हावेत अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली. तसेच त्यांनी चंद्रयान मोहिमेविषयी विद्यार्थ्यांना विस्ताराने माहिती दिली .अध्यक्षीय समारोपात उपप्राचार्य एम. एस. दाभाडे म्हणाले की ज्ञानात खूप मोठी शक्ती असते .ज्ञान माणसाला उच्च शिखरावर नेऊन पोहोचवीत असते . खूप साधी वाटणारी माणसं ज्ञानाच्या बळावर खूप मोठी झालेली आहेत. कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. दुर्गादास कान्हडकर यांनी केले तर संचालन आणि आभार प्रा. डॉ. श्याम गोरे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमास प्राध्यापक आणि महाविद्यालयातील विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.



# ज्येष्ठांच्या प्रलंबित प्रश्नावर चर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** आज जेष्ठ नागरिकांची मोठ्या प्रमाणात हेळसांड होत आहे. जेष्ठ नागरिकांचे आरोग्य टिकावे म्हणून सर्व प्रकारच्या वैद्यकीय सेवा त्यांना मोफत मिळाव्या, औषधी स्वस्त मिळावी,फिरते आरोग्य केंद्र असावे,हालचाल करू न शकणाऱ्या जेष्ठ साठी जिल्हा स्तरावर सुश्रुषा केंद्र असावे,आर्थिक स्थैर्य त्यांना मिळावे,शासनाच्या विविध योजनांचे सहाय्य शासनाने त्यांना वाढवून द्यावे,जे जेष्ठ एकटेच आहेत.

त्यांना पोलीस मदत केंद्र मार्फत संरक्षण मिळावे,राज्यातील प्रत्येक नगर परिषद, नगर पंचायत, मनपा, ग्रामपंचायत स्थरावर विरंगुळा केंद्र असावे,जेष्ठ नागरीक साठी शासकीय कार्यालय,बँक,व निमशासकीय कार्यालयात जेष्ठ नागरीक सहाय्य कक्ष असावा, त्यांना शासकीय कार्यक्रमात मान सन्मान पूर्वक बोलवावे, मंत्रालयात सुध्दा एक कक्ष असावा,सर्व स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये योजना व कार्यक्रम ची आखणी व्हावी ,जेष्ठांच्या तक्रारी प्राधान्य क्रम देऊन संबंधितांनी सोडवाव्यात इत्यादी बाबत या कार्यशाळेत चर्चा व मार्गदर्शन होणार आहे, अशी माहिती वैजीनाथ जेष्ठ नागरिक सेवा संघाचे सचिव धोंडीरामसिंह राजपूत यांनी दिली,सदरील कार्यशाळा नगर पालिका सभागृहात शुक्रवार( ता.१४ )रोजी दुपारी१२-१५वाजता आरंभ होणार आहे, तरी जेष्ठ नागरिकांनी या कार्यशाळेस उपस्थित रहावे असे आवाहन अध्यक्ष प्रकाशशेठ बोथरा,घनश्याम वाणी ,प्रा शिंदे, उत्तमराव साळुंके यांनी केले आहे.



# बॉडी बिल्डर जितू देसले यांचा सत्कार

## जितू देसले यांच्या कार्याला दिली सलामी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्ह्यातील शिरुड गावाचा पहिला बॉडी बिल्डर किरण सुनील तांबे यांनी गुरुपौर्णिमेनिमित्त त्यांचे गुरुवर्य मार्गदर्शक म्हणून उत्तर महाराष्ट्राचे फिटनेस आयकॉन बॉडी बिल्डर जितू देसले सर यांचे संपूर्ण शिरूड ग्रामस्थ च्या वतीने सत्कार करण्यात आला व आभार व्यक्त करण्यात आला.

ललित दादा कुलकर्णी यांनी जितू सरांविषयी मनोगत व्यक्त केले कि त्यांनी आजपर्यंत ग्रामस्थांनी जितू सरांना सोशल मीडियावरच त्यांना बघितलेलं होतं आज प्रत्यक्ष भेटून त्यांनी आपलं मत मांडलं बॉडी बिल्डिंग क्षेत्रात बऱ्याच वेळा असे लोक भेटतात जे हे विसरून जातात आपल्याला कोणीतरी मार्गदर्शन केलं होतं किंवा केलेला आहे त्याला विसरून जातात आणि असे वागतात की माझ्यासारखा कोणीच नाही असेही दाखवतील स्वतःच्या जीवावर हे सगळं मिळवले आणि स्वार्थी लोक एवढे भेटतील या क्षेत्रात की फक्त गरज आणि फायदा होईल तोपर्यंत ओळख ठेवतात जितु सर मी खरच तुम्हाला मानतो तुम्ही कधी स्वार्थीपणा केला नाही साधेपण आणि दिलदार पणामुळेच बरेच जणांनी जितू सरांचा फक्त फायदा घेतला आहे आणि विसरून गेले ही आजची सत्य परिस्थिती आहे पण तरी जितू सर मोफत मार्गदर्शन देणं व प्रत्येक युवकाला घडवणं अजूनही सोडलं नाही त्यांनी असे सांगितले व बॉडी बिल्डिंग माझी एक आवड आहे माझा बिझनेस नसून आणि ती मरेपर्यंत असणारखरंच धुळे जिल्ह्याला बॉडी बिल्डिंग क्षेत्रातला मिळालेला हा ज्वालामुखी आहे व त्यांच्या कार्याला सलामी दिली व सर्व ग्रामस्थांनी हे मनोगत ऐकल्यावर भारावून गेले व जितू दिसले सर यांचा आभारी मानला.

# सोयगाव तालुक्यात एसटी बस वाढवा : रत्नाताई चव्हाण चव्हाण यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील व सावळदबारा ग्रामीण भागातील बरेच गावे लालपरी पासून वंचित आहेत.सध्या शाळा चालू नाही असे कारण देत सोयगाव तालुक्यात एसटी बसेसच्या फेऱ्या आल्प प्रमाणात सुरू आहेत त्यामुळे विविध परीक्षा, प्राक्टिकलस तसेच प्रवेश परीक्षांच्या वर्गांना जाणाऱ्या विद्यार्थीचे मोठे हाल होत आहे. तर अशी विर्द्यांना मासिक पासही दिले जात नसल्याचे पालकाना रोज मोठा भुर्दंड सहन करावा लागत आहे . सोयगाव बस डेपोच्या वतीने एस टी बसेसच्या फेऱ्या वाढवाव्यात अशी मागणी सरपंच सौ रत्नाताई सुरेश चव्हाण घाणेगाव तांडा यांनी केली आहे .

तर मागे एक ते दिड महिना शाळाना सुट्टी म्हणून महामंडाळ बस फेऱ्या बंद केल्या होत्या. शाळाना सुट्या आसल्या तरी विद्यार्थीचे विविध वर्ग चालू आहेत. परंतु महामंडळाचे अधिकारी नियमावर बोट ठेवून पळवाटा शोधत आहेत. अनेक मार्गावरील बस बंद केल्या ओहत. ज्या काही थोड्याफार मार्गावर बस चालू आहेत .तेथे विद्यार्थी ये जा करत आहे तर तेथे विद्यार्थांना पास दिले जात नाहीत. यासाठी शाळांना सुट्या असल्याचे कारण दिले जात आहे. सोयगाव तालुक्यात इतर ठिकाणचे रोज शेकडो विद्यार्थी एसटी बस ची प्रतिक्षा करत रस्त्यावर उभे दिसत आहेत. ना बस चालु ना सवलतीचा पास दिला जात आहे. यात विद्यार्थी व पालकांचे मोठे हाल होत आहेत.बसच्या फेऱ्या वाढविण्यात याव्यात अशी मागणी सरपंच सौ रत्नाताई सुरेश चव्हाण यांनी सोयगाव आगार प्रमुख हिरालाल ठाकरे यांच्या कडे केली आहे.

# अफूची विक्री; महिलेसह तिघांना पकडले

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** शहरात अमली पदार्थांची विक्री करण्यासाठी आलेल्या एका महिलेसह तिघांना गुन्हे शाखेच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने अटक केली. हडपसर आणि मार्केट यार्ड भागात ही कारवाई करण्यात आली. आरोपींकडून २५ किलो गांजा, पाच लाखांची २५० ग्रॅम अफू जप्त करण्यात आली. या प्रकरणी एका महिलेसह लक्ष्मण गवनेर काळे ( वय ५५, रा. सोलापूर ), तुलछाराम गीगाराम चौधरी ( वय ३९, रा. बिबवेवाडी, मूळ रा, राजस्थान ) यांना अटक करण्यात आली. गुन्हे शाखेचे अमली पदार्थ विरोधी गस्त घालत होते.

# शेतकऱ्यांच्या मुलांनी राजकारणात यावे

## सरपंच मंगेश साबळे यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** शेतकऱ्यांच्या मुलाने घेतलेल्या शिक्षणाचा राजकारणात वापर करून येण्याची खरी गरज आली आहे. शेतकऱ्यांचे संघटन मजबूत करण्यासाठी आम्ही गावागावात जात आहोत. शेतकऱ्यांच्या पोरांनी राजकारणात यावे,' असे आवाहन सरपंच मंगेश साबळे यांनी गणोरी येथे युवा किसन मंच शेतकरी मेळाव्यात केले आहे. साबळे यांच्या नेतृत्वात युवा किसन मंचच्या माध्यमातून गणोरी येथे युवक शेतकरी मेळावा घेण्यात आला. 'सत्ता द्या हे सांगण्यासाठी येथे आलो नाही. तुमचा मुलगा ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, पंचायत समिती सदस्य, सभापती होण्यासाठी प्रयत्न करत आहे,' असे साबळे म्हणाले. 'मी बऱ्याच पक्षात काम केले. मला पण ते पुढे येऊ देत नाहीत. त्यामुळे आता जो तुमच्यासाठी काम करेल, त्याला मतदान करा,' असे सांगून किसान मंचच्या माध्यमातून वणवा सुरू केला असल्याचे साबळे यांनी सांगितले. या प्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अझहर सय्यद, सुदाम गायकवाड, अभिजित घोडके, साईनाथ बेडके यांनी आपले विचार व्यक्त केले. कृष्णा गाडेकर, राजू उबाळे आदी उपस्थित होते.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम
परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
• आम वात उदर रोग
• दमा व ॲलर्जी (जुनाट)
• चिकन गुनिया
• मनोकयीईक आजार
• त्वचा व गुप्त रोग
• स्त्रीयांचे आजार
• स्थूलपणा, मूळव्याध
• वंध्यत्व, संतती प्राप्ती
• कॅन्सर सल्ला, मुतखडा
• वजन वाढविणे
• वजन कमी करणे
• केसांच्या सर्व तक्रारी
• लहान मुलांची
• स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद





# अनाथ मुलांना शालेय साहित्य वाटप व मोफत शिकवणी वर्ग

आधुनिक केसरी न्यूज

**विठ्ठल ममताबादे**

**उरण :** सामाजिक कार्याचे ध्येय डोळ्यांसमोर ठेऊन समीर म्हात्रे यांनी स्थापन केलेल्या सायरा समीर म्हात्रे शैक्षणिक सामाजिक संस्था कळंबुसरे या संस्थेच्या माध्यमातून अनाथ मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप व मोफत शिकवणी वर्ग, रक्तदान शिबीर, आदिवासी बांधवांना जीवनोपयोगी साहित्य वाटप, सामाजिक संस्थांना पुरस्कार असे अनेक सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत.

वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे या तुकोबा रायांच्या उक्ती प्रमाणे वृक्षलागवडीचे महत्व लक्षात घेऊन संस्थेमार्फत मगबाची वाडी, रानसई उरण येथे "वृक्षारोपण कार्यक्रमा" अंतर्गत २५ झाडांची लागवड करण्यात आली व भविष्यात या झाडांचे संगोपन देखील करण्यात येणार आहे. या कार्यक्रमा प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून शितल पाटील फॉरेस्ट अधिकारी उरण, प्रितम टकले, मुख्याध्यापक,पी.पी.एम्. इंग्लिश मीडियम स्कूल, वेश्वी, महेश पाटील गाव अध्यक्ष कळंबुसरे यांची उपस्थिती लाभली. तसेच संस्थेचे सचिव संजय म्हात्रे, कार्याध्यक्ष पद्माकर पाटील, सदस्य शैलेश भोजानी, प्रणित राऊत यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या स्तुत्य अशा उपक्रमासाठी कु. प्रांजल सचिन पाटील, कळंबुसरे यांनी ५ झाडे,कु. प्रियांश प्रितम टकले गावठाण यांनी ५ झाडे दान स्वरूपात भेट दिली. त्या बद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष समीर म्हात्रे यांनी त्यांचे संस्थेच्या वतीने विशेष आभार मानले.

# जळगाव रेल्वेस्थानकावर आढळली तीन लहान बालके

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** १३ जुलै रोजी जळगाव रेल्वे स्थानक क्र. ३ वर तीन लहान बालके विना पालक फिरताना आढळून आले. केशव स्मुर्ती प्रतिष्ठान संचलित समतोल प्रकल्पाचे प्रदिप पाटील व रविना भगत हे आउटरिच करीत होते. त्या दरम्यान हे तिन्ही बालके विना पालक भटकतांना यांना दिसून आले. लागलीच बालकांना विचारपूस करण्यात आली, तिन्ही ही बालके उडवा उडवीचे उत्तर देत होती. त्यामुळे समतोलचे कर्मचारी यांनी त्यांना त्यांच्या बाल सहायता केंद्रात आणून समुपदेशन केले . मुले शाळेचे नाव करून परिवाराला न सांगता रेल्वे स्टेशनवर फिरायला आले होते . त्यामुळे दाखाने घरचा पत्ता व अधिक माहिती देण्यास नकार देत होते. हे बालके सकाळी ११:४५ ,च्या दरम्यान मिळाले त्या वेळेस तिन्ही स्थानकांवर येणाऱ्या जाणाऱ्या ट्रेन सुरू होत्या , प्रवाश्यांची ही गर्दी होती. त्यात हे तिन्ही १० ते १२ वर्षाचे लहान बालके शाळेची बेग लटकवून बिनदास फिरत होते.त्यांनी घरची माहिती देण्यास नकार दिल्यामुळे बालकांना काळजी व संरक्षणासाठी बाल कल्याण समिती समोर हजर केले असता , बालकांनी लगेच परिवारातील संपर्क क्रमांक दिले, घरच्यांना संपर्क करून ताबडतोब बालकांच्या परिवारांना घडलेली घटना सांगितली.



परिवाराचे सर्व सदस्य कामाला गेलेले होते , परिवाराला जेव्हा समजले की मुले शाळेचे नाव करून रेल्वे स्थानकावर भटकत असतांना मिळाले , तेव्हा ते घाबरत घाबरत कामावरून बालकल्याण समिती समोर हजर झाले .

पालकांनी बालकांवर लक्ष दिले पाहिजे , मुल शाळेत जातात की नाही हे , ही पालकांनी शाळेत जाऊन शिक्षकांशी भेटून चौकशी केली पाहिजे. आज जर ते मुल समतोल कर्मचारी यांना मिळाले नसते तर कोणती ही मोठी घटना या मुलांसोबत घडली असती , अशी माहिती बाल कल्याण समितीचे सदस्य श्रीमती वृषाली जोशी , विद्या बोरणारे , तसेच वैशाली विसपुते मॅडम यांनी पालकांना दिली .व त्या पालकांची कागदपत्रे तपासणी करून चौकशी करून बाल कल्याण समितीच्या आदेश्याने त्या बालकांना सुरक्षित परिवाराशी जोडून दिले.

या सोबतच यातील दोन मुलांचे वडील वारले होते त्यामुळे त्यांना संस्थेच्या माध्यमातून बाल संगोपन योजनेचा लाभ मिळवून देण्यात येत आहे . यावेळी पालकांनी संस्थेचे व संस्था कर्मचारी यांचे आभार मानले.

# जळगाव जामोद तालुक्यात 'आम्ही शरद पवार साहेबांसोबत' शपथपत्र अभियान

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** राज्यात गेल्या काही दिवसात राजकारणात प्रचंड उलथापालथी होत आहेत. अनपेक्षीतपने राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा एक गट अजित पवार यांच्या नेतृत्वात शिंदे फड़नवीस सरकार मध्ये सामिल झाला. सरकार मध्ये सामिल होण्याच्या या निर्णयाला मात्र राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांचा विरोध होता त्यामुळे पक्षात फुट पड़ली. बहुताश आमदार अजित पवार यांच्यासोबत जात असल्याचे चित्र असतांना तसेच जिल्ह्याचे नेते डॉ. राजेंद्र शिंगणे हे सुद्धा अजित पवार गटात जानार असल्याचे दिसत असतांना देखील पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मात्र शरद पवार यांच्या सोबत राहनार असल्याचे चित्र आहे. बुलढाणा जिल्ह्यातुन डॉ. राजेंद्र शिंगने जरी अजित पवार यांच्या सोबत गेले तरी आपन पवार साहेबांसोबत राहणार असल्याची भूमिका प्रदेष सरचिटनीस प्रसेनजीत पाटिल यांनी मांडली तसेच पुढच्या पक्षाच्या लढाई करिता आम्ही शरद पवार साहेबांसोबत असल्याचे प्रतिज्ञापत्र भरून घेण्याचे निर्देश तालुका पदाधिकार्यांना दिले. दिनांक १२ जुलै २०२३ पासून जळगांव जामोद तालुक्यात तालुक्याध्यक्ष प्रमोद सपकाळ, कार्याध्यक्ष महादेव भालतडक, महिला तालुकाध्यक्ष सौ. वर्षा वाघ, शहराध्यक्ष संजय ढगे यांच्या वतीने अभियानाची सुरुवात करण्यात आली. अभियानाला प्रचंड प्रतिसाद मिळत असुन पक्षाचे पदाधिकारी व सामान्य कार्यकर्ता शरद पवार साहेब यांच्या सोबतच असल्याचे तालुकाध्यक्ष प्रमोद सपकाळ यांच्या वतीने या प्रसंगी सांगण्यात आले.





# खंडाळा तालुकाध्यक्षपदी ॲड.रोहिदास हाके

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** आम आदमी पार्टी या पक्षाच्या जनसंपर्क कार्यालयाचे उदघाटन वाई तालुक्यात करण्यात आले.यावेळी ॲड.रोहिदास हाके यांची खंडाळा तालुक्याच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली.नियुक्ती पत्र देताना राज्य संघटना सचिव संदीप देसाई, सातारा जिल्हाध्यक्ष शिवाजी जाधव,

उपाध्यक्ष रतन पाटील, संघटक धीरजसिंह जाधव, सचिव मारुती जानकर,प्रवक्ते निवृत्ती शिंदे,वाई-विधानसभा युवा अध्यक्ष साहिल भोसले, वाई तालुका अध्यक्ष नितीन जगताप आदींसह इतर कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते. साहिल भोसले यांच्या नेतृत्वाखाली ॲड.रोहिदास हाके यांना खंडाळा तालुकाध्यक्ष पदाची जबाबदारी देण्यात आली.यावेळी जनतेच्या विविध विषयावर चर्चा करण्यात आली.जनतेचे विविध प्रश्न सोडवण्यास आम आदमी पार्टी सक्षम आहे, अशी आशा व्यक्त करण्यात आली.पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी दिल्ली व पंजाब मध्ये मोफत शिक्षण, आरोग्य, पाणी, २०० युनिट पर्यंत वीज, महिलांसाठी मोफत प्रवास आदी सोई सुविधा उपलब्ध करून दिल्या असल्याचे चर्चेतून संवाद साधताना म्हटलेले आहे. महाराष्ट्रात आम आदमी पार्टीचे सरकार स्थापन झाल्यास अशा योजना महाराष्ट्रात सुरू होतील.राज्यात जे राजकारण सुरू आहे ते योग्य नसल्याचे सामान्य जनतेला वाटत असल्याचे आम आदमी पार्टीने म्हटलेले आहे.

# एकतर्फी प्रेमातून तरुणीला मारहाण

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** एकतर्फी प्रेमातून तरुणीवर कोयत्याने वार केल्याची घटना ताजी असतानाच, 'तू माझ्यासोबत बोलत का नाही', अशी विचारणा करीत एकाने दांडक्याने मारहाण करून डोके फोडले आहे. ही घटना बुधवारी ( १२ जुलै ) सातच्या सुमारास कोरेगाव पार्कमधील बर्निंग घाट परिसरात घडली. याप्रकरणी पोलिसांनी आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. संकेत शहाजी म्हस्के ( वय २६ रा. संत गाडगे महाराज वसाहत, कोरेगाव पार्क ) असे अटक केलेल्याचे नाव आहे. हसीना कुंजू ( वय ३७ ) असे गंभीर जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे.संकेत हा कुंजूचा मित्र असून दोघेही एकाच परिसरात राहायला आहेत. मागील काही दिवसांपासून कुंजू त्याच्यासोबत बोलत नव्हती. त्याच रागातून संकेतने बुधवारी तिला बर्निंग घाट परिसरात गाठले. 'तू मला भेटत का नाही, माझे तुझ्यावर प्रेम आहे, तू माझी होऊ शकत नाही, तर कोणाचीही होऊ देणार नाही', असे म्हणत शिवीगाळ केली. 'माझे तुझ्यावर प्रेम नाही', असे म्हटल्यावर आरोपीने दांडक्याने तिला मारहाण करण्यास सुरुवात केली. हातावर पायावर मारहाणीमुळे तरुणी खाली पडल्यानंतरही संकेतने तिच्या डोक्यात दांडक्याने मारून जीवे मारण्याचा प्रयत्न केला.





# बाजार सावंगीला कायमस्वरूपी तलाठी द्या

## रयत शेतकरी संघटनेच्या वतीने तहसीलदार यांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील महसूल प्रशासनाच्या तीन गावांसाठी असलेल्या तलाठी सजा तलाठी पद रिक्त असल्याने महसूल कामकाजाची मोठी गैरसोय होत असून अत्यंत गरजवंत शेतकरी त्रस्त आहेत. बाजार सावंगी शेखपूर व सोबलगाव या सजाचे कार्यरत तलाठी असलेले लाचलुचपत प्रतिबंधक पथकाच्या कार्यवाहीच्या सापळ्यात सापडल्याने त्यांच्यावर कार्यवाही झाल्याने ती जागा रिक्त आहेत सुमारे एक ते दीड महिन्यापासून तलाठी कार्यालयाचे कामकाज बंद आहे. सर्वसामान्य शेतकरी व गरजवंत यांना सातबारा काढणे वारसा जमिनीची नोंद झालेल्या रजिस्ट्रीचा फेर नोंद करणे खरीप हंगामाची सुरुवात असल्याने शेतकऱ्यांना पिक विमा पीक कर्जाच्या नोंदीसाठी फेरफार होणे कर्ज कमी अधिकचे नोंदवणे व आवश्यक प्रमाणपत्र मिळणे यासह महसुली प्रशासनाच्या सर्व प्रकारच्या कामकाजासाठी कायमस्वरूपी तलाठी पद कार्यरत असणे अत्यंत गरजेचे आहे. यावेळी रयत शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष हरिदास सराटे व सामाजिक कार्यकर्ते वीरेंद्र वाघ यांच्या वतीने कायमस्वरूपी तलाठी पद देण्यात यावे अशी मागणी होत आहे.

# 108 मुनिश्री सोम्यसागरजी महाराजांच्या उपस्थितीत चातुर्मास कलश स्थापना

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** शहरातील जुनी मुंसबी, भाजी मंडई येथे सकल दिगबर जैन समाजाच्या वतीने पावन वर्षायोग 2023 आयोजित 108 मुनिश्री सौम्यसागर जी महाराजांच्या साक्षीने चातुर्मास कलश स्थापन करण्यात आली. त्यावेळी मंचावर जैन मुनिश्री 108 ओकार सागर महाराज, 108 मिराग सागर महाराज, 108 निश्चल सागर महाराज, 108 निर्भिक सागर महाराज, 108 निश्प्रह सागर महाराज, मुनिश्री यांच्या उपस्थितीत कलश स्थापन करण्यात आली. 108 मुनिश्री सौम्य सागर महाराज यांनी मानवता व सहनशीलता मानवा मध्ये राहिल्यास मनुष्य कुठल्या कुठे जातो. आणि श्रावण महिन्यात अधिकमास मध्ये माती ओली असली तरी आपण बसण्या साठी मार्ग मोकळा करतो. आणि गुरुदेव यांचा आशीर्वाद कुठूनही प्राप्त होतो. जिंतूर येथे माजी नगराध्यक्ष वसंतराव शिंदे, प्रताप देशमुख, मुकुंद सावजी कळमकर, तसेच सकल दिगंबर जैन समाज महिला व पुरुष या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# अय्युब पठाण यांना बालसाहित्य पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** लोहगांव ता.पैठण येथील प्रसिद्ध साहित्यिक अय्युब पठाण लोहगांवकर यांना नुकताच पुणे येथील अमरेंद्र बालकुमार संस्थेकडून "आईचा हात" या बालकविता संग्रहाला बालसाहित्य पुरस्कार जेष्ठ पत्रकार तथा बालसाहित्यिक महावीर जोंधळे आणि बालभारती पुणे येथील किशोर मासिकचे संपादक किरण केंद्रे यांच्या हस्ते पुरस्कार बाल कवी अय्युब पठाण लोहगांवकर यांना सन्मानपूर्वक पुणे येथे प्रदान करण्यात आले. यावेळी शेख जाहेद हुसेन, सलमान अन्सारी, मुदस्सीर पठाण, रज्जाक आतार हे उपस्थित होते.

# प्रा. डॉ. विटोरे 'सुंदरेश्वर साहित्यरत्न' पुरस्काराने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** आयुष अकॅडमी ऑफ परफॉर्मिंग आर्टस च्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त काल दिनांक 11 जुलै रोजी कुंभार पिंपळगाव येथे पुरस्कार वितरण समारंभ संपन्न झाला. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून सुप्रसिद्ध नाट्यदिग्दर्शक सिद्धार्थ तायडे ( ग्लोबल आडगाव या आगामी बिग बजेट चित्रपटाचे सह दिग्दर्शक ) हे होते. तर अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध मराठी अभिनेता ज्येष्ठ अभिनेते श्री बाबू काका आर्दड हे होते. यावेळी साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल मॉडेल कॉलेज घनसावंगी येथील हिंदी विभाग प्रमुख डॉ.कन्नूलाल विटोरे यांना यंदाचा" सुंदरेश्वर साहित्यरत्न पुरस्कार" देण्यात आला. तर नाट्य रंगमंच क्षेत्रातील योगदानाबद्दल शामसुंदर सुरासे यांना सुंदरेश्वर नाट्यरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले यावेळी मार्गदर्शन करताना प्रा. डॉ सिद्धार्थ तायडे म्हणाले की, आयुष परफॉर्मिंग आर्ट एक अनोखा आविष्कार मंच आहे. ग्रामीण भागातील गुणी कलावंतांसाठी, बालकलाकारांसाठी हक्काचे व्यासपीठ आहे.

भविष्यामध्ये या अकादमीतील विद्यार्थी नाट्यकला, संगीत, साहित्य विविध कलांमध्ये पारंगत होऊन नावलौकिक मिळवतील. बालनाट्य रंगमंच क्षत्रात संचालक श्री हरिदास घूंगासे आणि सह संचालक श्री.रघुनाथ ताठे यांचे मोलाचे योगदान राहिले आहे.असे उद्गार प्रख्यात रंगकर्मी तथा ग्लोबल आडगाव चित्रपटाचे सहायक दिग्दर्शक प्रा. डॉ. सिध्दार्थ तायडे यांनी व्यक्त केले. साहित्यिक प्रा. डॉ.कन्नुलाल विटोरे यांना त्यांच्या शिक्षण साहित्य आणि सांस्कृतिक क्षेत्रातील योगदानाबद्दल "सुंदरेश्वर साहित्यरत्न पुरस्कार २०२३" मान्यवरांचे हस्ते प्रदान करण्यात आला.



अध्यक्षस्थानी ज्येष्ठ रंगकर्मी बाबू काका आर्दड स्वीकारल्यानंतर मनोगत व्यक्त करताना प्रा. विटोरे म्हणाले की"लेखनास नवी ऊर्जा देणारा हा पुरस्कार आहे. माझी जबाबदारी वाढली असून भविष्यात साहित्य क्षेत्रात समर्पित भावनेने साहित्य सर्जन करेल. सुंदरेश्वर साहित्यरत्न पुरस्कार अनमोल असल्याचे प्रतिपादन प्रसिध्द साहित्यिक प्रा. डॉ.कन्नुलाल विटोरे यांनी केले. यावेळी सत्कारमूर्ती श्री शामसुंदर सुरासे यांनीही नाट्य क्षेत्रातील आपले अनुभव व्यक्त केले. ग्रामविकास अधिकारी भगत धनंजय कंटूले काळे आपले मनोगत व्यक्त केले. ग्रामीण भागातील कलावंत विद्यार्थ्यांना रंगमंचय अविष्काराची संधी मिळवून देणे आणि कलावंतांना शास्त्रोक्त पद्धतीने मार्गदर्शन करणे हा आयुष अकॅडमीचा उद्देश असल्याचे प्रतिादन संचालक हरिदास घुंगासे यांनी केले. आयुष अकॅडमी कलावंत घडविणारी प्रयोगशाळा असल्याचं मत रघु नाथ ताठे यांनी प्रासताविकातून मांडले. यशस्वी विद्यार्थी कलावंताचा गौरव मान्यवरांचे हस्ते करण्यात आला. सूत्रसंचालन एकता तर आभार प्रदर्शन संचालक हरिदास घूंगासे यांनी मानले. या वेळी सरपंच उमेश काजळे ,सतीश काटकर, ग्रामविकास अधिकारी गणकवार, अशोक जिजा कंटूले,किशोर शिंदे, भद्री जाधव, सोनू जाधव,अकॅडमी चे सहसंचालक संतोष मिरकड,योगेश पवार, किसन भोईटे, महेंद्र वाहुळे,प्रदीप धनवडे, अभय गुजर, किशोर मोरे,उपस्तिथी अखिल भाई,स्वप्निल रामदासी, बाळू बहिर, रमेश काळे, दादा आर्दड, दीपक गणकवार यांचेसह विद्यार्थी, कलावंत, पालक, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर